# बालाघाटचा आवाज

BALAGHATCHA AAWAJ

RNI No. MAHMAR 2019/78242 कार्य.संपादक : ॲड. प्रमोद बिरादार मो.नं. 9423238920 email,balaghatchawaj@gmail.com

लातूर दैनिक ● वर्ष ७ वा ● अंक ५६ वा ● शुक्रवार, दि. २१ जून २०२४ ● किंमत १ रूपया ● पाने ४


# परिचम विदर्भात शेतकऱ्यांच्या सर्वाधिक आत्महत्या

## सरकारची धोरणच शेतकऱ्याला मारक ठरतंय

अमरावती : पश्रि्चम विदर्भात सर्वाधिक शेतकऱ्यांच्या आत्महत्या होत असल्याचं आकडेवारीतून स्पष्ट होत आहे. सरकार शेतकऱ्यांच्या आत्महत्या रोखण्यात कमी पडलं आहे का असा प्रश्र्न विचारला जात आहे. आत्महत्या करणाऱ्यांची आकडेवारी दिवसेंदिवस वाढत आहे. जगाचा पोशिंदा असलेला शेतकरी गळफास लावत असून सरकारने या आत्महत्या थांबविण्यासाठी ठोस उपाय योजना करण्याची गरज आहे.

पश्रि्चम विदर्भात शेतकऱ्यांच्या आत्महत्या वाढत असून जानेवारी ते मे या ५ महिन्यात तब्बल ४६१ शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्या आहेत. एकट्या अमरावती जिल्ह्यात १४३ शेतकऱ्यांनी आपली जीवनयात्रा संपवली. नापिकी, अवकाळी पावसाने होणारे नुकसान यातून शेतकरी हतबल झालाय. यातच डोक्यावर वाढता कर्जाचा डोंगर, यातून आपला संसाराचा गाडा कसा हाकलायचा या विवंचनेत शेतकरी टोकाचं पाऊल उचलताना दिसतो आहे.

सरकारने या शेतकऱ्यांना धीर देण्याची गरज आहे. सातत्याने होणाऱ्या आत्महत्या कमी करण्यासाठी ठोस उपाययोजना करण्याची गरज असल्याचं मत भाजपचे खासदार आणि माजी कृषिमंत्री अनिल बोंडे यांनी व्यक्त केली आहे.

सरकारने कृषी मालावरती टॅक्स लावलेला आहे. मात्र हा टॅक्स शेतकऱ्यांसाठी डोकेदुखी ठरतोय. त्यामध्ये बियाणांची दरवाढ, यासोबतच बोगस बियाण्यांची होत असलेली विक्री यातून



शेतकरी देखील बियाण्यांची प्रतवारी ओळखू शकत नाही. त्यामुळे अनेक ठिकाणावरून शेतकऱ्यांची फसवणूक देखील होत आहे. अशा सर्व परिस्थितीतून शेतकरी जात असताना त्याला नैराश्य येतं आणि शेतकरी कायमची जीवन यात्रा संपवण्याचा निर्णय घेतो.

सरकार शेतकऱ्यांसाठी विविध योजना राबवतात. मात्र योजना शेवटच्या शेतकऱ्यांपर्यंत पोहोचत नसल्याचा आरोप वारंवार होत आहे. त्यामुळे सरकारने शेतकरी योजना राबवताना शेवटच्या शेतकऱ्याला त्याचा फायदा होईल अशा पद्धतीने उपाययोजना करणे गरजेचे आहे.

दुसरीकडे आमदार बच्चू कडू यांनी तर शेतकऱ्यांनी हत्या करण्याची तयारी केली पाहिजे, मतदानाच्या रुपात हत्या केली पाहिजे असं वक्तव्य केलं. सरकारच्या या पॉलीसी शेतकऱ्यांना मारण्यासाठीच आहेत, शेतकरी कसा मरेल यात राज्य सरकार सक्सेस झालं असल्याचा गंभीर आरोप त्यांनी केला.

**मे महिन्यात पश्रि्चम विदर्भातील जिल्हानिहाय शेतकरी आत्महत्या**

अमरावती – १४३, अकोला – ८२ , यवतमाळ – १३२ , बुलढाणा – ८३ , वाशिम – २१.

## जिव्हाळा ग्रुपचे प्लास्टिकमुक्त अभियान सुरू



उदगीर / बालाघाट नेटवर्क : येथील जिव्हाळा ग्रुपने सुरू केलेल्या प्लास्टिक मुक्त अभियानाची सुरुवात बुधवारी कापडी पिशव्यांचे वाटप करून व उदगीरच्या सार्वजनिक स्मशानभूमीत अंत्यसंस्कारासाठी आलेल्या प्रेतांची सेवा करणारे गोविंदराव गायकवाड यांचा सत्कार करून करण्यात आली.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी जिव्हाळा ग्रुपचे सचिव लक्ष्मीकांत बिडवई होते. तर कार्यक्रमास प्रमुख पाहुणे म्हणून मनोहरराव कुलकर्णी अतनूरकर, व्ही. एस. कुलकर्णी होते. यावेळी सार्वजनिक स्मशानभूमीत अंत्यसंस्कारासाठी आलेल्या प्रेतांची सेवा करणारे गोविंदराव गायकवाड व विविध क्षेत्रात काम करणारे चंद्रकांत रोडगे यांचा सत्कार यावेळी करण्यात आला.यावेळी जिव्हाळा ग्रुपचे संस्थापक अध्यक्ष विश्र्वनाथ मुडपे, माजी अध्यक्ष देविदास नादरगे, अध्यक्ष रमाकांत बनशेळकीकर, विश्र्वनाथ बिरादार माळेवाडीकर गोविंद निटूरे यांची समयोचित भाषणे झाली. या कार्यक्रमासाठी सतीश कुलकर्णी, नवनाथ पाटील, मारोती रोडगे , सोपानराव माने , हरिश्र्चंद्र वट्टमवार ,चंद्रकांत पांचाळ, हावगीराव आचारे, चंद्रकांत उप्परबावडे ,विक्रम हलकीकर, सुधीर वाडेकर, चारुदत्त वाडेकर यांनी पुढाकार घेतला. सूत्रसंचालन दशरथ शिंदे यांनी तर आभार प्रदर्शन शरणप्पा खेळगे यांनी केले.

## देवणी येथे शेतकरी संघटनेच्या वतीने चक्का जाम आंदोलन

देवणी / बालाघाट नेटवर्क : शेतकरी संघटनेच्या वतीने शेतकरी संघटना मराठवाडा अध्यक्ष आनंद जीवने यांच्या अध्यक्षतेखाली शेतकऱ्यांच्या विविध मागण्यांसाठी चक्काजाम आंदोलन करण्यात आले. या आंदोलनामध्ये सर्वच पक्षांनी शेतकरी संघटनेला पाठिंबा देऊन शेतकरी संघटनेच्या आंदोलना सोबत खांद्याला खांदा लावून सहभाग नोंदविला.आंदोलन मध्ये शेतकऱ्यांच्या प्रश्र्नावर विविध पक्षांच्या मान्यवरांचे मनोगत व्यक्त करण्यात आले,शेतकरी संघटनेच्या वतीने प्रशासनास निवेदन देण्यात आले त्या निवेदनात पिक कर्जाचा व्याज परतावा मिळावा, पिक विमा, अनुदान लागु करुन शेतकऱ्यांच्या खात्यावर रक्कम जमा करावे , दिवसा ८ तास लाईट मिळावे. अनधिकृत पणे पिक कर्ज वसुली च्या नावा खाली पिक कर्जदाराचे बॅंक खाते होल्ड केले आहे.त्याची चौकशी करून बॅंक अधिकाऱ्यावर कारवाई करण्यात यावी हे मागण्या मान्य नाही झाल्यास शेतकरी संघटनेच्या वतीने तीव्र आंदोलन छेडण्यात येईल असा इशारा देण्यात आला.

या आंदोलनास महाराष्ट्र उपाध्यक्ष शेतकरी संघटना सुरेंद्र आंबुलगे , महाराष्ट्र युवा प्रदेशाध्यक्ष मिथुन दिवे , युवा जिल्हाध्यक्ष ज्ञानेश्र्वर उजळंबे , निलंगा तालुका अध्यक्ष मेघराज रणखांब, लातूर जिल्हा सोशल मीडिया अध्यक्ष ऋषिकेश लोभे, कॉंग्रेस पक्षाचे नेते अरविंदजी भातंबरे,विकास नमनगे, मेळकुंदे मामा,भंडे दत्ता ,अमर अण्णा मुर्के अजित बेळकोने ,सोमनाथ लूले ,देविदास पतंगे ,शरण लुले ,अरुण पाटील औदुंबर पांचाळ ,माधवराव जी बिरादार ,श्रीमंतांना लुले ,योगेश जी तगरखेडे, चेतनजी मिटकरी मल्लिकार्जुन ईश्र्वरशेटे ,इब्राहिम तांबोळी ,करीम भाई शेख व तांबोळी परिवार खुरेशी चंद्रकांत, पांडुरंग जी कदम ,कल्याण भाऊ धनुरे ,रमेश जी कोतवाल, कोयले लक्ष्मण रणदिवे ,गिरधर जी गायकवाड, सिद्राम डोंगरे, बालाजी पाटील ,कालिदास बंडे, किशोर जी पाटील, विळेगावकर संजय ,अंबुलगेअजम भाई उंटवाले, असे अनेक शेतकरी देवणी शहर व तालुक्यातून या रास्ता रोको आंदोलनात उपस्थित होते.

## सोलापूरला गतवैभव मिळवुन देण्यासाठी अविरत काम करणार : खा.धैर्यशील मोहिते पाटील



सोलापूर / बालाघाट नेटवर्क : जिल्हातील युवकांचे नोकरी आणि व्यवसायाच्या निमित्ताने होणारे स्थलांतर थांबण्यासाठी आम्ही लोकप्रतिनिधी समवेत सर्व सोलापूरकरांची सकारात्मक साथ असणे आवश्यक आहे.

येणाऱ्या काळात सोलापूरला गतवैभव मिळवुन देण्यासाठी केंद्रातील विविध मंत्रालय आणि खात्यांच्या अधिकार्यां समवेत वेळोवेळी पाठपुरावा करून अविरत काम करणार असल्याची ग्वाही माढा लोकसभा मतदारसंघाचे नवनिर्वाचित खासदार धैर्यशील मोहिते पाटील यांनी दिली.

देगाव रोड येथील वसुंधरा अपार्टमेंट मध्ये प्रा.सारंग तारे यांच्या निवासस्थानी माढा लोकसभा मतदारसंघाचे नवनिर्वाचित खासदार धैर्यशील मोहिते पाटील यांच्या समवेत सोलापूरच्या विकासाशी निगडीत महत्त्वपूर्ण विषयांवर सोलापूर विकास मंचच्या सदस्यांची चर्चा झाली. सोलापूर विकास मंचच्या वतीने बुके ऐवजी शैक्षणिक साहित्य भेट म्हणून दिल्याबद्दल कौतुक केले. सोलापूर विकास मंच नेहमीच समाजाने आदर्श घ्यावा असेच कार्य करत आहे. ह्यावेळी सोलापूर विकास मंचचे सदस्य मिलिंद भोसले, केतन शहा, विजय कुंदन जाधव, ॲड. दत्तात्रय अंबुरे, सुहास भोसले, आनंद पाटील,धनराज बगले, गणेश शिलेदार, नरेंद्र भोसले, आरती अरगडे, गौरी आमडेकर आदी मान्यवर सदस्य उपस्थित होते.

## आयआयटी मुंबईच्या आठ विद्यार्थ्यांना प्रत्येकी तब्बल १.२० लाखांचा दंड!

मुंबई : आयआयटी मुंबईच्या आठ विद्यार्थ्यांना दंड ठोठावण्यात आला आहे. संस्थेच्या वार्षिक कला महोत्सवात रामायणावर आधारित नाटकातील मुख्य पात्राला अपमानित पद्धतीने दाखवण्यात आल्याचा आरोप त्यांच्यावर करण्यात आला होता. यासंदर्भात काही विद्यार्थ्यांनी तक्रार केली होती.

हा प्रकार संस्थेच्या वार्षिक कला महोत्सवात घडला होता. या प्रकरणी आता शिस्तभंग कृती समितीच्या शिफारशीनंतर नाटक सादर केलेल्या विद्यार्थ्यांमधील पदवीचं शिक्षण घेणाऱ्या प्रत्येक विद्यार्थ्याला १ लाख २० हजार रुपयांचा दंड तर कनिष्ठ महाविद्यालयातील विद्यार्थ्यांना प्रत्येकी ४० हजार रुपयांचा दंड ठोठावण्यात आला आहे. या वर्षी ३१ मार्च रोजी हा सांस्कृतिक कार्यक्रम झाला होता. 'राहोवन' नावाचं नाटक या विद्यार्थ्यांनी सादर केलं होतं. रामायणावर कथितरित्या आक्षेपार्ह नाटकाचं सादरीकरण केल्याप्रकरणी आयआयटी मुंबईने विद्यार्थ्यांना दंड ठोठावला. हा दंड थोडा थोडका नसून तब्बल १.२० लाखांचा आहे.

# चौथीपर्यंतच्या शाळा आता ९ नंतर भरणार

## लहान मुलांची झोपमोड थांबणार

छ. संभाजीनगर / बालाघाट नेटवर्क : जिल्ह्यातील सर्व माध्यमांच्या व सर्व व्यवस्थापनांच्या पूर्व प्राथमिक ते इयत्ता चौथीपर्यंतच्या शाळा सकाळी ९ वाजेनंतर भरणार आहेत. शिक्षणाधिकारी (प्राथमिक) जयश्री चव्हाण यांनी बुधवारी सर्व शाळांच्या मुख्याध्यापकांना तशा सूचना दिल्या आहेत. या सूचनांची अंमलबजावणी लगेचच करण्यास बजावण्यात आले आहे. परिणामी, लहान मुलांची सकाळी होणारी झोपमोड थांबणार आहे.

दरम्यान, राज्यातील बहुतेक शाळा सकाळी सात किंवा आठ वाजता भरतात. शाळेच्या वेळेआधी मुलांना एक ते दोन तास आधी तयारी करावी लागते. परिणामी लहान मुलांना सकाळी ६ वाजेपूर्वी उठावे लागत असल्याने त्यांची झोप पूर्ण होत नाही. काही महिन्यांपूर्वी राज्यपाल रमेश बैस यांनी लहान मुलांच्या झोपमोडीचा मुद्दा उपस्थित करून आवश्यक उपाययोजना करण्याची सूचना शालेय शिक्षण विभागाला केली होती. त्यानुसार शालेय शिक्षण विभागाने पूर्व प्राथमिक ते इयत्ता चौथीपर्यंतचे वर्ग सकाळी ९ वाजता



किंवा ९ वाजेनंतर भरविण्याचा निर्णय घेतला होता. परंतु आतापर्यंत त्याची अंमलबजावणी झाली नव्हती. आता १५ जूनपासून लहान मुलांची झोपमोड थांबणार आहे.शैक्षणिक वर्षाला सुरुवात झाली आहे. आताही बहुतेक शाळा सकाळी ९ वाजेपूर्वीच भरत आहेत. या पार्श्र्वभूमीवर छत्रपती संभाजीनगरच्या शिक्षणाधिकारी (प्राथमिक) जयश्री चव्हाण यांनी बुधवारी याबाबत सर्व माध्यमांच्या व सर्व व्यवस्थापनांच्या शाळांना शाळा भरविण्याच्या वेळेबाबत सूचना जारी केल्या आहेत. यात यापुढे पूर्व प्राथमिक म्हणजे बालवाडी ते इयत्ता चौथीपर्यंतचे वर्ग सकाळी ९ वाजेच्या आधी भरवता येणार नसल्याचे स्पष्टपणे नमूद केले आहे.

**जीवनशैलीत बदल झाल्याने निर्णय**

आधुनिक युगातील बदललेली जीवनशैली, मनोरंजनाची विविध साधने, शहरांमध्ये उशिरापर्यंत सुरू असलेले ध्वनिप्रदूषण आदी कारणांमुळे विद्यार्थी रात्री उशिरा झोपत आहेत. शाळा सकाळी लवकर असल्याने त्यांची झोप पूर्ण होत नाही. त्याचा नकारात्मक परिणाम विद्यार्थ्यांच्या शारीरिक व मानसिक आरोग्यावर होताना दिसत आहे. विद्यार्थ्यांची रात्रीची झोप पूर्ण होत नसल्याने ते दिवसभर आळसावलेले असतात. अभ्यासासाठीचा उत्साह कमी होतो. त्याचा नकारात्मक परिणाम अध्ययनावर होतो. तसेच हिवाळा व पावसाळा या ऋतूंमध्ये सकाळी लवकर उठून शाळेत जाण्यास त्रास होतो. बहुतेक वेळा थंडी आणि पावसामुळे मुले आजारी पडतात, या सर्व बाबी निदर्शनास आल्याने शासनाने शाळांच्या वेळेतील बदलाचा निर्णय घेतला.

**जिल्ह्यातील सर्व माध्यमांच्या प्राथमिक शाळांना सूचना**

जिल्ह्यातील सर्व माध्यमांच्या व सर्व व्यवस्थापनांच्या ज्या शाळांची पूर्व प्राथमिक ते इयत्ता चौथीपर्यंतचे वर्ग भरविण्याची वेळ सकाळी ९ वाजता वा अगोदरची आहे, त्या शाळांनी शैक्षणिक वर्ष सन २०२४–२५ पासून पूर्व प्राथमिक ते इयत्ता चौथीपर्यंतचे वर्ग भरविण्याबाबतची वेळ सकाळी ९ किंवा ९ वाजेनंतर ठेवावी. शाळेच्या वेळात बदल करताना बालकांचा मोफत आणि सक्तीच्या शिक्षणाचा अधिकार कायद्यानुसार शालेय शिक्षणासाठी अध्ययन व अध्यापनाचा निश्र्चित केलेला कालावधी कमी होणार नाही याची दक्षता संबंधित शाळा व्यवस्थापनाने घ्यावी.

ज्या शाळेच्या व्यवस्थापनांना आपल्या शाळेची वेळ बदलणे अगदीच शक्य होत नसेल तर त्यांनी या कार्यालयास आपल्या अडचणींसह प्रस्ताव दाखल करावा. शिक्षणाधिकारी कार्यालयाच्या पूर्वपरवानगीशिवाय पूर्व प्राथमिक ते इयत्ता चौथीपर्यंतचे वर्ग सकाळी ९ वाजेपूर्वी भरविण्यात येऊ नयेत.

# लातूर जिल्हा रुग्णालयाच्या जागेचा प्रश्न निकाली

## ३ कोटी ३२ लाख ६८ हजार ६५० रुपये आरोग्य विभाग अदा करणार; साठ दिवसाच्या आत हस्तांतरण प्रक्रिया पूर्ण करण्याचे निर्देश

लातूर / बालाघाट नेटवर्क : जिल्हा रुग्णालय लातूरसाठी कृषी महाविद्यालय लातूर येथील दहा एकर जमीन हस्तांतरणास मंजुरी देण्यात आली आहे. आरोग्य विभागाच्या वतीने ३ कोटी ३२ लाख ६८ हजार ६५० रुपये अदा करण्यात येणार असून जमीन हस्तांतरणाची प्रक्रिया साठ दिवसात पूर्ण करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. जिल्हा रुग्णालयाच्या प्रश्र्नासाठी माझं लातूर परिवाराच्या वतीने म. गांधी चौक येथे आंदोलन करण्यात आले होते. या आंदोलनाची दखल घेत हा निर्णय झाल्याने लातुरात नागरिकांना आणखी एक आरोग्याची सुविधा उपलब्ध झाली म्हणून आनंद व्यक्त करण्यात येत आहे.

लातूरचे नेते दिवंगत विलासराव देशमुख यांनी लातूर येथे शासकीय वैद्यकीय महाविद्यालयाची स्थापना केली. त्यामुळे लातूरचे जिल्हा रुग्णालय शासकीय वैद्यकीय महाविद्यालयाकडे हस्तांतरीत करण्यात आले. नियमाप्रमाणे जिल्हा रुग्णालय पाच वर्षात होणे आवश्यक असताना त्याकडे कोणीही लक्ष दिले नाही. जिल्हा रुग्णालयाला मंजुरीही देण्यात आली होती तर विद्यमान सरकारने पाचशे खाटाच्या जिल्हा रुग्णालयास मान्यता दिली. परंतु ते कागदावरच राहिले होते.

माझं लातूरच्या वतीने या प्रश्र्नाचा सातत्याने पाठपुरावा करण्यात आला. लातूर जिल्ह्यातील सर्व प्रमुख लोकप्रतिनिधी, अधिकारी यांच्यासह थेट मुंबईत जाऊन मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री, आरोग्य मंत्री, पालकमंत्री यांना निवेदनही देण्यात आली होती. म. गांधी चौकात आंदोलन करण्यात आले होते. त्यावेळी मुख्यमंत्र्यासह



सर्वांनीच हा प्रश्र्न तातडीने निकाली काढू, असे आश्र्वासन दिले होते. १९ जून रोजी यासंदर्भात शासनाने काढलेल्या शासन निर्णयानुसार कृषी विद्यालय लातूर येथील सर्वे नंबर ३७ मधील १० एकर जमीन वसंतराव नाईक मराठवाडा कृषी विद्यापीठ परभणी यांच्याकडून जिल्हा रुग्णालयासाठी हस्तांतरीत करण्यास मान्यता देण्यात आली. सदरील जमिनीचा मोबदला ३ कोटी ३२ लाख ६८ हजार ६५० रुपये कृषी विभागास वर्ग करण्यास मान्यता देण्यात आली. जमीन हस्तांतरणाची कार्यवाही महसूल विभागाच्या वतीने जिल्हाधिकार्यांनी पूर्ण करावी. हस्तांतरणासाठी दोन्ही विभागामार्फत सामंजस्य करार जिल्हास्तरावर करण्यात यावा. जमिनीच्या अभिलेखात सार्वजनिक आरोग्य विभाग जिल्हा शल्य चिकित्सक लातूर याचा स्पष्ट उल्लेख करावा. महसूल विभागास देय रक्कम विद्यापीठाने अदा करावी. जास्तीत जास्त साठ दिवसाच्या आत हस्तांतरणाची प्रक्रिया पूर्ण करावी, असे शासन निर्णयात नमूद करण्यात आले आहे. वित्त विभागाने याची तरतूदही केलेली आहे.

या जिल्हा रुग्णालयासाठी माझं लातूर परिवारातील सदस्यांसोबतच आमदार अमित देशमुख, आमदार धीरज देशमुख, आमदार संभाजी पाटील निलंगेकर, आमदार अभिमन्यू पवार, माजी मंत्री दिलीपराव देशमुख, माजी आमदार शिवाजी पाटील कव्हेकर, जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर घुगे, तहसीलदार सौदागर तांदळे, जिल्हा शल्य चिकित्सक डॉ प्रदिप ढेले, डॉ लक्ष्मण देशमुख, डॉ अर्चना पाटील चाकूरकर, ड. बळवंत जाधव, माजी खासदार सुनिल गायकवाड, अभिजीत देशमुख, ड. किरण जाधव, माजी महापौर विक्रांत गोजमगुंडे, दिपक सुळ, माजी उपमहापौर चंद्रकांत बिराजदार, विश्र्वजीत गायकवाड, खासदार डॉ. शिवाजी काळगे, कृषी मुल्य आयोगाचे अध्यक्ष पाशा पटेल, मंत्री संजय बनसोडे, यांच्यासह अनेकांनी पाठपुरावा केला होता. कॉंग्रेस, राष्ट्रवादी कॉंग्रेस, शिवसेना यांच्यासह विविध ५८ पक्ष संघटनांनी जिल्हा रुग्णालयासाठी माझं लातूरच्या आंदोलनास पाठिंबा दिला होता.

# संपादकीय...

## फडणवीसच कायम!

नुकत्याच पार पडलेल्या लोकसभेच्या निवडणुकीत भाजपाला महाराष्ट्रात अपेक्षित यश मिळाले नाही.भाजपाला हा पराभव जिव्हारी लागला. स्वत: उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी या पराभवाची जबाबदारी स्वीकारून सरकारमधून त्यांना मोकळे करण्याची विनंती भाजपाच्या केंद्रीय नेतृत्वाला केली होती. आगामी विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर राज्यात भाजपा हायकमांडकडून मोठा फेरबदल होणार असल्याच्या जोरदार चर्चा सुरू झाल्या होत्या; परंतु केंद्रीय नेतृत्वासोबत झालेल्या राज्याच्या भाजपाच्या कोअर कमिटीच्या बैठकीत उपमुख्यमंत्री फडणवीसांची ही मागणी फेटाळण्यात आली. एवढेच नव्हे तर राज्यात कुठलेही बदल केले जाणार नाहीत, असे स्पष्ट संकेत केंद्रीय मंत्री पीयूष गोयल यांनी राज्यातील भाजपा नेतृत्वाची धुरा देवेंद्र फडणवीस यांच्याकडे सोपवताना जाहीर केले. त्यामुळे फडणवीस यांचे मंत्रीपद जाणार की ते दिल्लीत जाणार या चर्चेलाही आता पूर्णविराम मिळाला आहे. महाराष्ट्राची कोअर कमिटीची केंद्रीय नेतृत्वासोबत दिल्लीत बैठक झाली. फडणवीस यांच्यावर केंद्रीय नेतृत्वाने विश्वास दाखवल्यानंतर ते जोमाने कामाला लागल्याचे त्वरित दिसून आले. लोकसभा निवडणुकीत महाराष्ट्रात आम्ही कुठे कमी पडलो, त्याचा काय परिणाम झाला? यावर काय उपाययोजना करायला पाहिजेत, यावर सविस्तर बैठकीत चर्चा झाली. त्याचबरोबर येणाऱ्या विधानसभा निवडणुकीमध्ये कशा पद्धतीची रणनीती असायला पाहिजे? त्याच्या ब्लूप्रिंटवर चर्चा झाल्याचे देवेंद्र फडणवीस यांनी माध्यमांना सांगितले.

दिल्लीत नरेंद्र आणि राज्यात देवेंद्र असा नारा देत पुन्हा भाजपा विधानसभा निवडणुकीच्या तयारीला लागली आहे, असे प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांनी जाहीर करून टाकले आहे. त्यामुळे भाजपाची प्रदेश कार्यकारिणी ही ठामपणे देवेंद्र फडणवीस यांच्या पाठीशी उभी असल्याचे दिसून आले. सलग पाच वर्षे मुख्यमंत्रीपदाचा कार्यकाळ पूर्ण करणाऱ्या आतापर्यंतच्या मुख्यमंत्रीपदाच्या रांगेत देवेंद्र फडणवीस यांचे नाव आदराने घेतले जाते. २०१९ साली झालेल्या विधानसभा निवडणुकीत जनतेने मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखालील भाजपा–शिवसेना युतीला बहुमताचा कौल दिला होता; परंतु उद्धव ठाकरे यांनी अडीच वर्षे मुख्यमंत्रीपद शिवसेनेला मिळावे अशी अचानक मागणी निकाल जाहीर झाल्यानंतर केली. या मागणीवर कोणतीही उघड चर्चा झाली नव्हती. तरीही मुख्यमंत्री पदाच्या मोहापायी उद्धव ठाकरे यांनी जनतेच्या मतांचा अनादर करत, विरोधी पक्ष असलेल्या काँग्रेस आणि राष्ट्रवादी काँग्रेस बरोबर घरोबा केला. महाराष्ट्रात महाविकास आघाडीच्या नावाखाली विचित्र युतीचे सरकार अस्तित्वात आले. खरं तर उद्धव ठाकरे यांनी फडणवीस आणि भाजपाच्या पाठीत खंजीर खुपसून, सत्तेचे लोणी खाण्याचा प्रयत्न केला असला तरी, देवेंद्र फडणवीस हे खचले नाहीत. विधानसभेतील विरोधी पक्ष नेतेपदाची जबाबदारी पार पाडत त्यांनी महाविकास आघाडीतील भ्रष्ट कारभारावर टीका करण्याची संधी सोडली नाही. अडीच वर्षांच्या आतच शिवसेनेत पडलेल्या उभ्या फुटीनंतर, महाविकास आघाडीचे सरकार कोसळले. पुन्हा भाजपाला सत्तेची आयती संधी चालून आली. देवेंद्र फडणवीस हेच मुख्यमंत्री होतील, असे बोलले जात होते; परंतु भाजपासोबत आलेल्या मित्रपक्षाला सांभाळून घेण्यासाठी भाजपाच्या केंद्रीय नेतृत्वाने महाराष्ट्राच्या मुख्यमंत्रीपदावर फडणवीस यांच्याऐवजी एकनाथ शिंदे यांच्या नावाची घोषणा केली होती. वैयक्तिक मानसन्मान, समाजातील प्रतिष्ठा आणि राजकारणात रुबाब कायम ठेवत काम करणाऱ्या देवेंद्र फडणवीस यांनी उपमुख्यमंत्रीपद स्वीकारून, पक्षाचा आदेश हा किती मोठा असतो. त्याचे पालन करायचे असते हे दाखवून दिले.

एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वाखालील शिवसेना आणि अजित पवार यांच्या नेतृत्वाखालील राष्ट्रवादीला घेऊन महायुती म्हणून आज विधानसभेत २८८ पैकी २०० हून अधिक आमदारांचे बळ आहे. असे असताना लोकसभा निवडणुकीत भाजपाला जास्त प्रमाणात खासदारकीच्या जागा निवडून आणता आल्या नाहीत. या पराभवाची जबाबदारी स्वीकारून आपल्या पदाचा राजीनामा देणारे फडणवीस यांच्या नैतिक अधिष्ठानाचे कौतुक करायला हवे. कारण सध्याच्या राजकारणात कोणत्याही व्यक्तीला आपले पद सोडण्याची इच्छा होत नाही. मात्र येत्या चार महिन्यांत येऊ घातलेल्या विधानसभेच्या निवडणुकांमध्ये महाराष्ट्रात जनतेला आश्वासक वाटणारा चेहरा कोण? यावर भाजपाच्या केंद्रीय नेतृत्वामध्ये मंथन झाले. देवेंद्र फडणवीस यांच्या एवढा पॅन महाराष्ट्र लोकप्रिय नेता नाही, हे यावरून दिसून आले. त्याच कारणाने सरकारमधील उपमुख्यमंत्रीपद कायम ठेवून पक्षाने देवेंद्र फडणवीस यांच्यावर मोठा विश्वास दाखवला आहे. समृद्धी महामार्गाचे काम, मुंबई शहरातील मेट्रोचे जाळे ही फडणवीस मुख्यमंत्री असताना सुरू झालेली कामे आहेत. महाविकास आघाडीकडून न्यायालयीन लढाईत मराठा आरक्षणासंदर्भात योग्य रितीने बाजू मांडता आली नसल्याने आरक्षणाचा पेच निर्माण झाला होता. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखालील महायुती सरकारने पुन्हा मराठा समाजाला आरक्षण देण्याचा ठराव चार महिन्यांपूर्वी मंजूर केला; परंतु सुरुवातीला मराठा समाजाला आरक्षण देण्यासाठी जो महत्त्वपूर्ण निर्णय राज्य सरकारने घेतला होता तो फडणवीस यांच्या मुख्यमंत्रीपदाच्या कार्यकाळात होता. त्यामुळे समाजा–समाजामध्ये दुही निर्माण करण्याचा प्रयत्न काही मंडळी करत असली तरी, त्याला यश येणार नाही. सत्य आता जनतेला कळलेले आहे. महाविकास आघाडीचे सरकार हे त्यांच्या कर्माने पडेल असे फडणवीस त्यावेळी म्हणाले होते, तसे पुढे घडले. आता महाराष्ट्राच्या नेतृत्वाची जबाबदारी फडणवीस यांच्याकडे असल्याने, येत्या विधानसभेत त्यांच्या नेतृत्वाखाली पुन्हा भाजपाप्रणीत महायुतीला यश मिळेल, असा विश्वास केंद्रीय नेतृत्वाला वाटू लागला आहे.

### राजा नारायणलाल लाहोटीमध्ये राष्ट्रीय वाचन दिन साजरा

लातूर : राजा नारायणलाल लाहोटी इंग्लिश स्कूल मध्ये बुधवारी राष्ट्रीय वाचन दिन उत्साहात साजरा करण्यात आला. राष्ट्रीय वाचन दिवस हा १९ जून रोजी केरळमधील ग्रंथालय आणि साक्षरता चळवळीचे जनक पीएन पैनिकर यांच्या ग्रंथालय चळवळीतील योगदान आणि केरळ मध्ये वाचनाला चालना दिल्याबद्दल त्यांच्या स्मरणार्थ साजरा केला जातो. पैनिकर यांचा जन्म १ मार्च १९०९ रोजी झाला होता. ते एक शिक्षक होते. त्यांचा समाजावर खूप प्रभाव होता. १९४५ मध्ये ४७ ग्रामीण ग्रंथालयांसह तिरूविट्मकुर ग्रंथशाळा संगम ची स्थापना केली. ग्रंथालय स्थापनेच्या मोहिमेचे नेतृत्व त्यांनी केले होते. केरळ मध्ये गावोगावी फिरून त्यांनी लोकांना वाचनाचे महत्व पटवून दिले.

# घर घर चलो अभियान

लोकसभा निवडणुकीत कॉंग्रेस, राष्ट्रवादी कॉंग्रेस (शरद पवार) आणि उबाठा सेना मिळून महाआघाडीला जेवढे मतदान झाले, त्यापेक्षा केवळ अर्धा टक्के कमी मतदान भाजपा, शिवसेना (एकनाथ शिंदे) व राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार) हे तीन पक्ष मिळून महायुतीला झाले, असा दावा केला जात असला तरी राज्यात सत्तेवर असलेल्या महायुतीला ४८ पैकी केवळ १७ जागा मिळाल्या आहेत व दोन वर्षांपूर्वी सत्ता गमावलेल्या महाआघाडीला ३१ जागांवर विजय मिळाला आहे. गेल्या दोन वर्षांत शिवसेना व राष्ट्रवादी काँग्रेस पक्षात झालेली तोडफोड, महाविकास आघाडीचे सरकार कोसळणे व महायुतीचे सरकार स्थापन होणे याचा लाभ लोकसभा निवडणुकीत महायुतीला झालेला नाही. मतदारांची नाराजी तोडाफोडीच्या राजकारणावर आहे की, केंद्रातील भाजपा सरकारच्या कारभारावर आहे, याचे चिंतन करण्याची गरज आहे. महाराष्ट्रातील विधानसभा निवडणूक केवळ चार महिन्यांवर आली असून अशीच परिस्थिती कायम राहिली तर महाआघाडी विरुद्ध महायुती असा अटीतटीचा संघर्ष होईल अशी चिन्हे दिसत आहेत.

लोकसभा निवडणुकीतील पराभवानंतर भाजपा व महायुतीमधील मित्रपक्ष हबकले आहेत. भाजपाने तर पराभवाची गंभीर दखल घेऊन कारणे शोधायला सुरुवात केली आहे. महाआघाडी व महायुती यांच्या केवळ ०.३ टक्के मतांचे अंतर आहे, याचा अर्थ जनतेने महायुतीला पूर्णपणे नाकारलेले नाही, असे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस सांगत आहेत. पुन्हा एकदा मेहनत करून महायुतीची दीड टक्के मते वाढविल्यास राज्यात विधानसभा निवडणुकीत विजय मिळवू शकतो, असा विश्वास फडणवीस यांनी व्यक्त केला आहे.

लोकसभा निवडणुकीत महाघाडीने राज्यात आश्चर्यकारक यश संपादन केले वर महायुतीला धक्कादायक पराभव स्वीकारावा लागला. ज्या मतदारांनी २०१४ व २०१९ मध्ये भाजपाला धुवांधार मतदान करून केंद्रात सत्तेवर बसवले, महाराष्ट्रात नंबर १ नेऊन ठेवले, त्याच मतदारांनी भाजपाला २०२४ मध्ये जमिनीवर आणले आहे. केवळ सरकार चालवून भागणार नाही, तर घराघरांपर्यंत पोहोचले पाहिजे याची जाणीव भाजपाला झाली आहे. दलित, आदिवासी, मराठा समाजाला जवळ आणण्यासाठी जाणीवपूर्वक प्रयत्न करावे लागणार आहेत. केंद्रात व राज्यात भाजपा सत्तेवर असताना महाराष्ट्रात पराभव होणे ही नामुष्की आहे, पक्षाच्या कार्यकर्त्यांना ऊर्जा देऊन त्यांना सक्रिय बनवावे लागेल, असे मत मुंबईत झालेल्या पक्षनेते व पदाधिकाऱ्यांच्या बैठकीत व्यक्त केले गेले. देवेंद्र फडणवीस, चंद्रशेख बावनकुळे, पीयूष गोयल, विनोद तावडे यांना पुढाकार घेऊन काम करावे लागणार आहे.

महायुतीची टक्केवारी ४३.६ टक्के असताना आता मागे हटण्याचा प्रश्नच उद्भवत नाही, मात्र जिथे कमी पडलो तिथे कसर भरून काढण्यासाठी वाटेल ती मेहनत करण्याची तयारी पक्षाच्या केडरला ठेवावी लागणार आहे. मराठा आरक्षणाविषयी संभ्रम व संविधानात बदल होणार असा इंडिया आघाडीने केलेला प्रचार याची किंमत लोकसभा निवडणुकीत भाजपाला मोजावी लागली, असे नेत्यांचे मत आहे. देवेंद्र फडणवीस मुख्यमंत्री असतानाच लंडन येथे डॉ. बाबासाहेब आंबेडकर आंतरराष्ट्रीय केंद्र स्थापन झाले, दादर येथील इंदू मिलच्या जागेवर डॉ. आंबेडकरांचे भव्य स्मारक उभारणीचे काम वेगाने चालू आहे,




केंद्र व राज्याने दलितांच्या हितासाठी अनेक योजना सुरू केल्या आहेत, असे असताना भाजपा सत्तेवर आल्यावर संविधानात बदल करणार असा प्रचार इंडियाने केला, त्याला सडेतोड उत्तर दिले पाहिजे, असे बैठकीत ठरले. मराठा समाजाच्या नेत्यांचे गैरसमज दूर करण्यासाठी ठोस प्रयत्न करावे लागणार आहेत. वेळ कमी आहे व विधानसभा निवडणूक जवळ येत आहे.

खूप कमी फरकाने महायुतीचा राज्यात पराभव झाला आणि मुस्लीम मतांच्या व्होट बँकेवर महाआघाडीचा विजय झाला असे विश्लेषण केले जात आहे. यंदाच्या निवडणुकीत मुस्लीम मतदारांची एकगठ्ठा मते आघाडीला विशेषत: उबाठा सेनेच्या उमेदवारांना पडली. गेले दोन महिने मुस्लीम मतदारांची तशी मानसिकता पद्धतशीर करण्यात आली होती. अनेक मतदारसंघात आघाडीच्या उमेदवाराच्या प्रचाराला वाहने, पाण्याच्या बाटल्या, खाण्याची व्यवस्था मुस्लीम समाजाच्या वतीने करण्यात आली होती. उबाठा सेनेच्या उमेदवाराला मतदान करायचे असे फतवे मुंबईतील पन्नास मशिदीतून निघाल्याची वदंता होती. मराठी मतदारांचे महाआघाडी व महायुतीत विभाजन झाले पण मुस्लीम व ख्रिश्चन तसेच अल्पसंख्याक मतदार हे मोठ्या प्रमाणावर महाघाडीकडे आकर्षित झाले. उबाठा सेनेविषयी प्रेम म्हणून नव्हे किंवा उबाठा सेनेच्या नेते जवळचे वाटतात म्हणून नव्हे, तर उबाठा सेना ही पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना हटविण्यासाठी लढत आहे, म्हणून मुस्लीम मतदारांनी त्यांच्या पारड्यात एकगठ्ठा मतदान केले.

सन २०१९ मध्ये झालेल्या लोकसभा निवडणुकीत भाजपाने शिवसेनेशी युती करून २५ जागा लढवल्या होत्या. भाजपाला तेव्हा २७.८४ टक्के मते मिळाली होती. त्या निवडणुकीत अविभाजीत शिवसेनेने २३ जागा लढवल्या होत्या आणि त्या पक्षाला २३.५० टक्के मतदान झाले होते. याचा अर्थ गेल्या निवडणुकीत युतीला ५१.२६ टक्के मते मिळाली होती. सन २०२४ मध्ये भाजपा, शिवसेना (शिंदे) व राष्ट्रवादी काँग्रेस (अजितदादा) या तीन पक्षांनी मिळून महायुती म्हणून निवडणूक लढवली. महायुतीला यंदा ४३.६ टक्के मते मिळाली आहेत.

म्हणजेच गेल्या निवडणुकीपेक्षा यंदा भाजपाप्रणीत महायुतीला ७.७५ टक्के मते कमी मिळाली ही चिंताजनक बाब आहे. सन २०१९ मध्ये काँग्रेस व राष्ट्रवादी काँग्रेस यांनी आघाडी करून लोकसभा निवडणूक लढवली होती. अविभाजित शिवसेना व अविभाजित राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाची तोडफोड झाल्यावर त्यांच्या मतांची टक्केवारी खरी तर खूप कमी व्हायला हवी होती. पण उबाठा सेनेला बरोबर घेऊन लढलेल्या महाआघाडीची मतांची टक्केवारी ११.८३ टक्क्यांनी गेल्या वेळेपेक्षा वाढली आहे, असे लक्षात येते.२०२४ मध्ये झालेल्या लोकसभा निवडणुकीत राज्यात महाआघाडीला २ कोटी ५० लाख, तर महायुतीला २ कोटी ४८ लाख मते मिळाल्याचे सांगण्यात येते, तर मुंबईमध्ये महाआघाडीला २४ लाख, तर महायुतीला २५ लाख मते मिळाली आहेत. गेल्या वेळी भाजपाला २५ जागांवर लढताना १ कोटी ४९ लाख मते मिळाली, तर शिवसेनेला १ कोटी २५ लाख मते पडली होती. युतीला एकूण २ कोटी ७४ लाख मते मिळाली होती. तसेच गेल्या निवडणुकीत राष्ट्रवादी काँग्रेसला व काँग्रेस महाआघाडीला मिळून १ कोटी ७० लाख मतदान झाले होते. यंदा २०२४ मध्ये महायुतीला २ कोटी ५० लाख व महाआघाडीला २ कोटी ४८ लाख मतदान झाले आहे. तुलनेने कोणाची मते वाढली व कोणाची किती कमी झाली त्याची ही आकडेवारी बोलकी आहे.

मुंबईमध्ये महाआघाडीपेक्षा महायुतीला १ लाख मते जास्त मिळाल्याचा दावा महायुतीकडून केला जात आहे. गेल्या निवडणुकीत मुंबई उत्तर मतदारसंघात भाजपा उमेदवाराला ४ लाख ६५ हजार मते मिळाली होती. यंदा भाजपाची ही आकडेवारी ३ लाख ५७ हजारांपर्यंत खाली घसरली आहे. खरे तर मतदारांची संख्या तिथे वाढल्याने मताधिक्य वाढायला हवे होते, पण तसे झाले नाही. धुळे, नगर, अमरावती, भंडारा, नांदेड, लातूर, भिवंडी, बीड, तसेच मुंबई अशा १० ते ११ जागांवर केवळ पाच टक्क्यांच्या फरकाने पराभव झाला, असा महायुतीच्या वतीने युक्तिवाद केला जात आहे. २०१९ मध्ये या जागांवर किती मते मिळाली होती व यंदा किती मिळाली याची तुलना केली, तर मताधिक्य कुठे किती कमी झाले हे लक्षात येईल. दोन–अडीच लाखांचे मताधिक्य देणाऱ्या लातूर, नगर, अकोला या जागा भाजपाला यंदा का गमवाव्या लागल्या? मुस्लीम मतदार एकगठ्ठा मतदान उबाठा सेनेला व काँग्रेसला करणार, ही कल्पना महायुतीला अगोदर नव्हती का? मराठा आरक्षणाचा मुद्दा जिथे तीव्र होता, तिथे विशेषत: मराठवाड्यात भाजपाला नुकसान सहन करावे लागले. टाटा एअर बस, वेदांता. फॉक्स कॉन, असे अनेक प्रकल्प शेजारी राज्यात गेले, त्याच्याही नाराजीचा फटका भाजपाला यंदा बसला. शेतकऱ्याची नाराजी तसेच कांदा, सोयाबीन मुद्दे भाजपाला अडचणीचे ठरले. अनेक ठिकाणी उमेदवार बदलले व भाजपाने नवीन चेहरे दिले ते मतदारांना रुचले नाहीत. झालेले नुकसान भरून काढण्यासाठी, आता घर घर चलो अभियान ही पहिली पायरी आहे.

# आला पाऊस अवतरला हिरवा बहर

वर्षभर पडणारा बेहिशेबी पाऊस ही हवामानबदलाच्या परिणामामुळे दिसणारी समस्या असली तरी सर्जनाचे मळे फुलवण्यासाठी येणारा मोसमी पाऊस मात्र एक वरदानच आहे. तो येतो आणि हिरवा बहर देऊन जातो. हा बहर जीवनप्रवाहाचा मुख्य सूत्रधार आहे. त्यामुळे केवळ मनुष्यच नव्हे तर चराचरातील प्रत्येक जीव आपापल्या पद्धतीने पर्जन्यसुक्त आळवताना दिसतो. त्याच्या फलिताचा हा काळ आहे. हा रम्य पाऊसकाळ आहे!

नभ उतरू लागले आहे. एक आगळे झिम्माडपण अंगी घुमू लागले आहे. निसर्गातील हा बदल आपल्याला हिरव्या बहराकडे घेऊन जाणारा आहे. म्हणूनच तो उभारी देणारा आहे. हा बहर संपूर्ण चराचरामध्ये चैतन्य खेळवणारा आहे. शुष्कतेला हिरवाईमध्ये बदलवून टाकणारा आहे. त्यामुळेच या ऋतूपालटाला निसर्गचक्रात अपरंपार महत्त्व आहे. कदाचित त्यामुळेच असेल की, आपल्याकडे सण–समारंभांच्या पर्वाची सुरुवातच या ओलेत्या आणि गर्द मंडपाखाली होते.

आताही पाऊस सुरू झाला आहे. मत्त मेघांच्या झुंडी वेशीवर आदळू लागल्या आहेत. गर्जत, ललकारी देत, नाद करत हा चैतन्यरथ हळूहळू पुढे सरकेल आणि बघता बघता अवघा देश पादाक्रांत करेल. तो पुढे जाताना मागील प्रांत सुजलाम सुफलाम होत जाईल. ही समृद्धी सजीवांमधील जीवन प्रवाहित करणारी आहे. मातीआड लोटल्या गेलेल्या बीजांना फलनाचे दान देणारी आहे. तीव्र झळांनी भाजून, करपून गेलेल्या गवतकाड्यांमध्ये प्राण परतवणारी आहे. संपू पाहणाऱ्या, त्रासलेल्या, कष्टलेल्या आणि श्रांत–क्लांत झालेल्या कोणत्याही जीवाला त्याच्या जगण्याला आशेचा एक थेंबही पुरेसा असतो. पाऊस ही आशा घेऊन येतो. पाण्याचे दोन–चार घोट तहानलेल्या जीवांना आधार देतात. ओंजळभर पाण्याचा हबका शिणलेल्या आणि थकलेल्या चेहऱ्यावर टवटवी आणतो. पाण्याचा तो झुळझुळता स्पर्श तनामनाची रखरख कमी करतो. ती स्नेहल सलगी आपल्या वृत्तींनाही तरल बनवते. असे असताना पावसाळ्यात तर आपण धारांची अविरत बरसात अनुभवतो. कुंद वातावरण, मधूनच अंधाराची माया दाटून आल्यानंतर सुटणारा बेभान वारा, त्या लयीत झोके घेणारे डेरेदार वृक्ष आणि अशा भारलेल्या वातावरणात मोठ्या दिमाखात बरसरणारा तो वरुणराज गेले कित्येक दिवस आपण या वातावरणाची, ऋतुचक्रातील या बदलाची वाट बघत होतो. प्रत्येकाला समृद्धीचा सांगावा घेऊन घेणारा पाऊस हवा होता. तो आता आला आहे. त्याचे सहर्ष स्वागत करायला हवे!

पावसाची स्वत:ची अशी एक भाषा असते आणि ही भाषा कळणे हेच माणूसपणाचे लक्षणही असते. या भाषेत शब्द नसले तरी नाद आहे. लिपी नसली तरी दृश्यमानता आहे. शब्दांच्या त्या सुरेल ओळी जमिनीच्या धुळपाटीवर स्पष्ट वाचता येतात. ते नाचरे शब्दांतून समोर येणारे गीत हृदयाच्या तारा छेडून जाते. त्यातील गेयता आणि सुरेलता थेट काळजाला भिडते. त्या शब्दांचा स्पर्श सर्वांगाला जाणवतो. म्हणूनच पावसाचे सुंदर गाणे होऊन जाते. कुणासाठी ते बडबडगीत असते, तर कुणासाठी छानसे प्रणयगीत, कुणासाठी विरहगीत असते तर कुणासाठी भावगीत भावनेप्रमाणेच संगीताच्या प्रत्येक शाखेमध्ये पाऊस आहे. कलेच्या प्रत्येक दालनात त्याचा मुक्त वावर आहे. तो स्वरात आहे, शब्दांत आहे, पदन्यासात आहे, वाद्यांमधल्या तारांमधून निघणाऱ्या झंकारात आहे आणि नर्तिकेच्या भावमुद्रा तसेच हस्तमुद्रांमध्येही आहे.पावसाच्या एक थेंबाने प्रफुल्लित झालेला कोणी चित्रकार त्याच्या समोरील कॅन्व्हासवरही अथांग सागर रेखू शकतो, तर अशाच जलधारा पंखांवर नाचवणारा चिमुकला पक्षी एखाद्या निष्णांत नर्तकाला लाजवेल असे नाचू शकतो. कारण पावसाच्या धारांमुळे मिळणारी संजीवनी, नवचैतन्य आणि उन्माद आत्मीक आहे. त्यात कुठलीही कृत्रिमता नाही, परकेपणा नाही. तो स्वानंद आहे आणि स्वानुभूतीही आहे. ही अनुभूती घेण्यासाठी रानावनात फिरायलाच हवे, स्वच्छंद ढगांसवे बागडायला हवे, त्याच्यात मिसळून जायलाच हवे असे काही नाही. याचे आहे तसे रूप आपल्या अव्यक्त भावनांशी अगदी सहजतेने एकरूप होते. म्हणूनच शरीर कामात असले तरी तो येताच दबक्या पावलांनी बाजूला जात मन त्याच्या हातात हात मिसळून केव्हा येते हे आपल्यालाही समजत नाही. दूर असलो तरी त्याचा स्निग्ध स्पर्श सतत जाणवत राहतो. त्याची स्निग्ध सोबत सुखावत राहते. हलकेच त्याच्याशी कानगोष्टी सुरू होतात. पाहुण्यांच्या येण्यामुळे दिनक्रम बदलत नसला तरी वातावरण बदलते. एक प्रकारचा मोकळेपणा जाणवतो आणि साचलेल्या भावनांना वाट मोकळी करून दिली जाते. या लाडक्या पाहुण्याच्या आगमनानेही अगदी तसेच होते.आजचा समाज पर्जन्यसुक्त गाणारा नाही. कुठलासा राग आळवल्यानंतर मेघांची गर्दी व्हायची आणि पाऊस कोसळू लागायचा या कल्पना त्याला भ्रामक आणि काव्यात्मक वाटतात. बेधुंद होऊन कोसळणाऱ्या पावसात समोरचा 'धबाबा कोसळणारा तोय' बघत समाधीस्त होणे त्याला शक्य नाही. वेगाने पळणाऱ्या कालचक्राशी स्पर्धा करण्यासाठी त्याला धावण्याचा वेग कायम राखणे गरजेचे आहे, नव्हे ते अपरिहार्यच आहे. म्हणूनच पावसाची संततधार त्याला सतावू शकते.



जल ग्रहण करण्याची जमिनीची क्षमता अडवलेल्या या समाजाला मग काँक्रीटच्या रस्त्यांवर साठणाऱ्या तळ्यांचा त्रास होतो. सडपातळ होण्याच्या हट्टहासापायी शस्त्रक्रिया करून घेताना एखाद्याचे आतडे शिवून टाकावे तसेच काहीसे आहे हे! पण काँक्रीट ओतून आतडे शिवल्यानंतर हा जीवनरस वाट फुटेल त्या दिशेने जाणार नाही, तर काय करणार? तो तर आनंदाचे मळे फुलवण्यासाठी बरसला आहे. पण आपल्या करंटेपणाने सध्या तो बरसला की मळे नव्हे तर गटारे फुलतात. रंगीबेरंगी कमळ फुलवण्यासाठी पडलेल्या या पावसाच्या पाण्यात प्लास्टिक तरंगायला लागते. जागोजागी साठलेला कचरा पाण्यासवे वाहत जाऊन ठिकठिकाणी अडकतो आणि वेगाने धावणाऱ्या समाजाचे चक्र त्यात फसायला लागते. खरे तर हा गाळ त्याने स्वत:च निर्माण केला आहे. पण नाकातोंडात पाणी जायला लागले की, आपण पावसाच्या नावाने खडे फोडून मोकळे होतो. थोडक्यात, वर्षानुवर्षाच्या अनुभवावरूनही माणूस काही शिकलेला नाही आणि कदाचित शिकणारही नाही. एकेकाळी सार्वत्रिक असणारी कृषीप्रधानता आता मर्यादित झाली आहे. अनेकांची पाळेमुळे अगदी नावापुरती जमिनीमध्ये आहेत. अन्यथा, अनेकांनी कुंड्यामधल्या मातीतच बोन्साय होऊन जगणे पसंत केले आहे. बहरललेला, आखीव–रेखीव आकार असणारा, मर्यादित, शोभेपुरती पाने–फुले असणारा आणि खाण्यायोग्य नसणारी फळे मिरवणारा हा बोन्सायरुपी खुंटित समाज एक प्रकारे अलिप्ततावादी आहे, स्थितप्रज्ञ आहे. पाऊस पडला नाही तर कृत्रिम पावसाची तजवीज करण्याच्या तयारीत असणारा आहे. कमी पावसाच्या प्रदेशातही हिरवाई बहरते आणि उरात पेट्रोलची धग बाळगणाऱ्या जमिनीवरही समृध्दीचे मळे फुलतात, अशी उदाहरणे देणारा आहे. अशांना ढासळणाऱ्या पर्यावरण संतुलनाशी आणि कमी होणाऱ्या पाऊस काळाशी काहीही घेणे देणे नाही. जंगलांचा गळा आवळताना, नदीनाल्यांच्या माना मुरगाळताना, डेरेदार वृक्षांवरुन यांत्रिक करवती चालवताना आणि इंच इंच जमिनीवर बांधकाम करुन काँक्रिटची जंगले उभारताना त्यांना अजिबात वैषम्य वाटत नाही. उगवलेला दिवस ओरबाडून जगण्याच्या वृत्तीने झपाटलेली ही माणसे भविष्याचा विचार करण्यास तयार नाहीत. त्यामुळेच आजचे पावसाचे गाणे कधी कधी केविलवाणे होऊन जाते.

सर्जनशीलतेचे दान घेऊन आलेल्या या बहराच्या काळातच अनेकांवर काळाची झडप पडते. पोखरुन पोकळ केलेल्या डोंगराचे कडे ढपल्या पडाव्या तसे कोसळतात, भराव घालून आत दाबलेल्या पाण्यात वाहने वाहून जातात. धोकादायक परिस्थितीत असूनही वर्षानुवर्षे दुर्लक्षित झालेल्या इमारती पावसाच्या तडाख्यात भुईसपाट होतात. नियमांचे पालन न करता उभारलेली अजस्त्र होर्डिंग कोसळून सांगाड्याखाली काहींचे जीव जातात तर काही जन्मासाठी जायबंदी होतात. उघड्या गटारातून वाहून गेलेल्यांचे मृतदेह दूरवर कुठे तरी सापडतात, तेव्हा त्या दुर्घटनेची चर्चा होते. साचलेल्या पाण्यात विजेचा प्रवाह उतरतो, एखाद्या खांबावर स्थिरावतो आणि काहींचे जीव घेऊनच थांबतो. पावसाला अशा अपघातांची आता सवय झाली असावी, कारण हे वर्षानुवर्ष घडत आहे. मात्र ही परिस्थिती तात्काळ बदलण्याची भाबडी आशा बाळगण्याचेही काही कारण नाही. अर्थातच या सगळ्यात ऋतूराजाची काहीही चूक नाही. हजार हातांनी दिले जाणारे दान घेताना एखाद्याची झोळीच तोकडी असेल तर तिथे दात्याचा दोष नाही तर तो अशा करंट्या माणसांचा आहे. तो नेहमीच्या उन्मादात येणार, छतावर ताडताड बरसणार, शेताशिवारात बेभान कोसळणार आणि सृजनाचे मळे फुलवणार. त्यासवे आपण फुलायचे की उन्मळून पडायचे हा ज्याचे त्याने ठरवावे.

# कौतुकास्पद कामगिरीबद्दल ग्रामीण पोलीस स्टेशनचे पो. नि. अरविंद पवार व पो. उपनि. चेरले गौरवान्वित

**उदगीर**–उदगीर ग्रामीण पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक अरविंद पवार आणि पोलीस उपनिरीक्षक तानाजी चेरले तसेच पोलीस हेड कॉन्स्टेबल राम बनसोडे यांनी केलेल्या उत्कृष्ट कामगिरीची दखल जिल्हा पोलीस अधीक्षकांनी घेतली आहे. दर महिन्याला जिल्ह्यातील एकूण पोलीस कर्मचारी आणि अधिकारी यांच्या कार्याची नोंद आणि तुलनात्मक आढावा जिल्हा पोलीस अधीक्षक कार्यालयाकडून घेतला जातो. त्यामध्ये उदगीर ग्रामीण पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक अरविंद पवार आणि त्यांच्या सहकाऱ्यांनी केलेल्या उत्कृष्ट कार्याला सन्मानित करण्यासाठी पोलीस अधीक्षक कार्यालयामध्ये त्यांचा सत्कार करण्यात आला. उत्कृष्ट कार्याची नोंद करत त्यांना तसे प्रमाणपत्र



ही देण्यात आले. अत्यंत शांत, संयमी आणि कार्य तत्पर असलेले पोलीस निरीक्षक अरविंद पवार आणि पोलीस उपनिरीक्षक तानाजी चेरले, पोलीस हेडकॉन्स्टेबल राम बनसोडे यांचा सन्मान स्वतः जिल्हा पोलीस अधीक्षक सोमय मुंडे यांनी केला आहे.

आपले काम भले आणि आपण भले, अशा पद्धतीने कार्यपद्धती ठेवलेल्या पो. नि.अरविंद पवार यांच्या एकूण कामगिरीबद्दल उदगीर तालुक्यातील सर्वसामान्य माणूस समाधानी आहे. पोलीस स्टेशन अंतर्गत अनेक गावे आहेत, तुलनेत मनुष्यबळ कमी असताना देखील अत्यंत उत्कृष्ट पद्धतीने गुन्ह्याचा तपास करणे, प्रलंबित गुन्ह्याचे प्रमाणात अत्यंत कमी ठेवणे, नियोजनबद्ध पद्धतीने उत्कृष्ट कार्य करून आपला ठसा उमटवण्यामध्ये पो. नि. अरविंद पवार आणि तानाजी चेरले यांचा हातखंडा आहे. खऱ्या अर्थाने पोलिसांचे जे ब्रीद आहे सदरक्षणाय खलनिग्रहणाय याची प्रत्यक्ष अंमलबजावणी उदगीर ग्रामीण पोलीस करत असल्याची चर्चा तालुक्यात आहे. अत्यंत मितभाषी परंतु कार्यामध्ये कधीही हलगर्जीपणा न करणारे अधिकारी म्हणून अरविंद पवार यांची ओळख आहे. स्वभावाने कठोर वाटत असले तरी कायदा आणि सुव्यवस्था टिकून राहिली पाहिजे, यासाठी कधी कधी ते कठोर भूमिका घेतात. उदगीर शहराचा बराच भाग उदगीर ग्रामीण पोलीस स्टेशन अंतर्गत येत असला तरी, कुठेही कायदा सुव्यवस्थेला गालबोट लागणार नाही, याची दक्षता स्वतः पो. नि.अरविंद पवार आणि त्यांचे सहकारी घेत असतात. ही उल्लेखनीय बाब आहे. ही सामाजिक जबाबदारी पार पाडत असतानाच पोलीस प्रशासनाच्या कामात देखील अव्वल राहणे निश्चितच कौतुकास्पद आहे. आपण स्वतः काम करत असतानाच आपल्या कर्मचाऱ्याकडून देखील त्याच तत्परतेने काम करून घेण्यामध्ये पो. नि. अरविंद पवार आणि पोलीस उपनिरीक्षक तानाजी चेरले हे पटाईत आहेत. आपल्या कर्मचाऱ्यावर पूर्ण विश्वास दाखवत असल्यामुळे, कर्मचारीही उत्स्फूर्तपणे आणि विश्वासाने काम करत असतात. एकूण या एकजुटीमुळे पोलीस प्रशासनाची प्रतिमा उजाळत चालली आहे. सकारात्मक दृष्टिकोन ठेवून आपल्या कार्यामध्ये सतत मग्न राहणारे पोलीस निरीक्षक अरविंद पवार आणि पोलीस उपनिरीक्षक तानाजी चेरले व हेड कॉन्स्टेबल राम बनसोडे यांना वरिष्ठ अधिकाऱ्याकडून सन्मानित केल्याबद्दल उदगीर ग्रामीण पोलीस स्टेशनच्या सर्व कर्मचाऱ्यांच्या वतीने तसेच उदगीर तालुक्यातील सर्व जनतेतून कौतुकाचा आणि अभिनंदनचा वर्षाव केला जात आहे. विशेष म्हणजे जिल्हा पोलीस अधीक्षक कार्यालयाकडून पोलीस अधिकाऱ्यांच्या एकूण कामकाजाचा आढावा घेत असताना कौतुकास्पद कामगिरीमध्येही उदगीर ग्रामीण पोलीस स्टेशन अव्वल ठरले आहे. तसेच सी सी टी एन एस डाटा फीडिंग मध्ये देखील उदगीर ग्रामीण पोलीस स्टेशन अव्वल ठरले आहे. गेल्या महिन्यातील एकूण कामकाजामध्ये दोन वेळा पो. नि.अरविंद पवार यांना सन्मानित करण्यात आले. तसेच पोलीस कॉन्स्टेबल टी के कज्जेवाड यांनाही सन्मानित करण्यात आले आहे.

जिल्ह्यातील कर्तबगार आणि विविध कार्यप्रणालीमध्ये सन्मानित करण्यात आलेल्या अधिकारी आणि कर्मचाऱ्यांच्या कार्याचा गौरव करण्यासाठी, त्यांचे फोटो लातूर जिल्हा पोलीस अधीक्षक कार्यालयांमध्ये दर्शनीय भागात लावले आहेत. उदगीर ग्रामीण पोलीस स्टेशनला मिळालेल्या या बहुमानाबद्दल निश्चितच जिल्ह्यामध्ये उदगीरचे नावलौकिक वाढले आहे, असे म्हटले तर वावगे होणार नाही.

## तर जरांगेंच्या हाकेला किती मराठ्यांची पोरे रस्त्यावर उतरतील?

**मुंबई**–राज्यात ओबीसी आणि मराठा आरक्षण अत्यंत कळीचा मुद्दा होऊन गेला आहे. एका बाजूने मराठा आरक्षणासाठी मनोज जरांगे पाटील यांनी यांनी लोकशाही मार्गाने आंदोलनाचे मार्ग पत्करला आहे. मात्र, दुसरीकडे त्यांच्या पाठीराखांकडून, समर्थकांकडून मात्र नैराश्येपोटी आत्महत्यांची मालिकाच सुरू आहे. दुसरीकडे ओबीसी आरक्षणासाठी सुद्धा आंदोलन सुरूच आहे. त्यामुळे राज्यांमध्ये मराठा विरुद्ध ओबीसी असंच चित्र निर्माण झालं आहे.या यादीमध्ये प्रसाद देठे नावाच्या मराठा कार्यकर्त्याची भर पडली आहे. प्रसाद देठे यांनी मराठा आरक्षणासाठी आत्महत्या करत जरांगे पाटील आरक्षण घेतल्याशिवाय मागे हटू नका असा सल्ला दिला आहे. प्रसाद यांनी आत्महत्या करण्यापूर्वी चिट्ठी लिहिली आहे. तसेच फ `सबुक लाईव्ह सुद्धा केलं आहे. या फेसबुक लाईव्हमधून त्यांनी मराठा आरक्षणाचा मुद्दा किती महत्त्वाचा आहे हे पोटतिडकीने सांगण्याचा प्रयत्न केला आहे. इतकेच नव्हे, तर फक्त मराठा आरक्षण मिळावे या हेतूने आपण आत्महत्या करत असल्याचे म्हटले आहे. आपल्या आत्महत्येला कोणीही जबाबदार धरू नये असे सुद्धा म्हटले आहे. फेसबुक लाईव्हमध्ये मराठा आरक्षण का आवश्यक आहे सांगतानाच हे सांगतान प्रभाकरनचा श्रीलंकेतील लढ्याची ही माहिती दिली आहे. त्यामुळे प्रसाद देठे यांनी हा मराठा आरक्षणाचा विषय किती खोलवर मनामध्ये घेतला होता, याची जाणीव फेसबुक पोस्टमधून येते. मराठा आरक्षणासाठी लाईव्ह येऊन बरेच दिवस झाले आहेत. नाही म्हटले, तरी दीड ते दोन वर्ष झाली असतील. कालही नाईट ड्युटी केली होती. आजही नाईट ड्युटी आहे. तुळापूरला गेल्याने झोप झालेली नाही आणि इतरही बरीच कामे होती. आज मी तुम्हाला एक छोटी गोष्ट सांगणार आहे ही जी नेहमीच मित्रांना सुद्धा सांगत आलो आहे. भारतातील शेतकऱ्यांना ज्या पद्धतीने शेती करता येत होती, त्याच पद्धतीने श्रीलंकेतील सिंहली लोकांना शेती करता येत नव्हती. त्यामुळे त्यांनी भारतातील केरळमधील लोकांना नेऊन श्रीलंकेला शेती करण्यासाठी नेले होते.


## शिंदे परिवाराकडून गुणवंताधारक विद्यार्थ्यांचा विशेष सत्कार

**मुरुम**–शिक्षणाशिवाय विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्त्वाचा विकास होऊ शकत नाही हा दृष्टिकोन सतत डोळ्यासमोर ठेवून शैक्षणिक क्षेत्रात अविरत कार्य करणारे दिवंगत सिद्राम गंगाराम शिंदे गुरुजी यांच्या स्मरणार्थ बुधवारी (ता. १९) रोजी शहरातील श्रीराम मंगल कार्यालयात दहावी–बारावीच्या गुणवंत विद्यार्थ्यांचा शिंदे परिवाराकडून विशेष सत्कार समारंभाचे आयोजन करण्यात आले होते. प्रारंभी सरस्वतीच्या प्रतिमेस उपस्थित मान्यवरांच्या हस्ते पुष्पहार घालून दीप प्रज्वलन करण्यात आले. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी पुणे येथील आरोग्य विभागाचे माजी संचालक डॉ. रायप्पा कटके होते. यावेळी महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समितीचे जिल्हा कार्याध्यक्ष प्रा. डॉ. महेश मोटे, धम्मचारी धम्मभूषण राम कांबळे, मुख्याध्यापक विजयकुमार देशमाने, मुख्याध्यापिका प्रमिला तुपेरे, मंकावती कांबळे, गंगाधर शिंदे, प्रा. रुक्मिणी शिंदे, बळीराम शिंदे, सीए शिवराज मिटकरी, हिमाचल प्रदेश येथे केंद्र सरकारच्या वस्त्र मंत्रालय विभागात टेक्स्टाईल इंजिनियर तथा मुरूमचे सुपुत्र शिवाजी शिंदे, माजी सुभेदार मेजर विजयकुमार शिंदे, रूपाली शिंदे, मंगल शिंदे आदींची प्रमुख उपस्थिती होती. यावेळी शहरातील विविध शाळांमधील ७५ पेक्षा अधिक गुणवंत विद्यार्थी व पालकांचा सन्मानचिन्ह, शैक्षणिक साहित्य देवून मान्यवरांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. शिंदे कुटुंबीयांच्या वतीने जिल्हा परिषद कन्या प्रशालेच्या मुख्याध्यापिका मंकावती कांबळे यांच्याकडे शाळेतील गरजू विद्यार्थ्यांसाठी दोन सायकली भेट म्हणून देण्यात आल्या. याप्रसंगी गंगाधर शिंदे, प्रा. रुक्मिणी शिंदे, प्रमिला तुपेरे, बळीराम शिंदे, मंकावती कांबळे, विजयकुमार देशमाने, प्रा. डॉ. महेश मोटे आदींनी मनोगत व्यक्त करताना म्हटले की, गुणवंत विद्यार्थ्यांच्या यशामुळे आपापल्या शाळेची उंची वाढत असल्याबद्दल आनंद व्यक्त करून कौतुक केले. आई–वडील, गुरुजनांनी केलेले संस्कार कधीही विसरू नका. आपली प्रतिमा आपल्यालाच निर्माण करावी लागते. विमान जसं वरती जातं तसंच ते परत खालीही येतं. त्यामुळे पाय जमिनीवर राहातील याचे भान ठेवा. आपल्या जीवनात समाजाचे स्थान महत्त्वाचे आहे, त्यामुळे समाजाला परत द्यायला शिका. जसे मोठे व्हाल तसे अमिषांपासून, व्यसनांपासून दूर राहा. तुमचे वय स्वप्न बघण्याचे आहे, पण अशीच स्वप्न बघा जी झोपू देत नाहीत. आपले आरोग्यदेखील तितकेच महत्त्वाचे आहे. त्यामुळे तब्येत कमवा. ध्येय गाठण्याची जिद्द बाळगा. आम्हाला तुमचा अभिमान आहेच, पण आयुष्यात असे काही करा की आईवडील व गुरुजनांनाही तुमचा अभिमान वाटेल. अध्यक्षीय समारोप प्रसंगी डॉ. कटके म्हणाले की, माणसाने नेहमी एखाद्याच्या खऱ्या क्षमतेची जाणीव करून ती पूर्ण करण्यासाठी प्रयत्न केले पाहिजेत. विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक वाटचालीला दिशा देण्यासाठी विद्यार्थी, पालक व शिक्षक एकाच छताखाली आज या कार्यक्रमानिमित्ताने एकत्र आले आहेत. हा एक अद्भुत अनुभव आहे. अशा कार्यक्रमांमुळे शैक्षणिक क्षेत्रातील विद्यार्थ्यांचे मनोबल वाढेल आणि त्यांच्या कलागुणांना वाव मिळेल, असा विश्वास त्यांनी व्यक्त करीत कार्यक्रमाचे आयोजक शिवाजी शिंदे व त्यांच्या कुटुंबियांचे कौतुक केले.

गुणवंत विद्यार्थ्यांच्या सत्कार सोहळ्याचे मुख्य आयोजक असणाऱ्या शिवाजी शिंदे व सौ. रुपाली शिंदे यांचा डॉ. खाजालाल ढोबळे यांनी विशेष सत्कार केला. याप्रसंगी शहरातील विविध दैनिकांच्या प्रतिनिधींचा विशेष सत्कार मान्यवरांच्या हस्ते करण्यात आला. कार्यक्रमाकरिता ऐश्वर्या शिंदे, सचिन शिंदे, ज्योतीराम शिंदे, वसंत शिंदे, धनराज शिंदे, तुकाराम शिंदे, गिरजप्पा कावळे, रेवण कटके, राजु कटके, अंबादास शिंदे, प्रवीण शिंदे, धोंडीबा शिंदे, जयश्री कांबळे, रेश्मा शिंदे, वैभव कटके आदींनी परिश्रम घेतले. प्रास्ताविक शिवाजी शिंदे यांनी केले. सूत्रसंचालन अजिंक्य मुरूमकर तर आभार तात्याराव शिंदे यांनी मानले. यावेळी परिसरातील बहुसंख्य नागरिक उपस्थित होते.

# टाईमपास शब्दकोडे

आडवे शब्द
१.खास नसलेला,हिंदीत आंबा
४.आली लहर केला ---
६.हळव्या मनाचा
८.'--- अर्जुन' एक हिंदी चित्रपट
१०.फळातील द्रव भाग,आवड
११.ज्याला ऐकु येत नाही असा
१२.इंग्रजीत विजेता
१३.सल्ला,विचार विनीमय,खल
१५.एक पंजाबी पोशाख
१७.कमानीसारखे,ार्धवर्तुळाकार
२०.घटट नसलेले,विरळ
२१.मतदान करण्याचा अधिकार असलेला
२३.त्या प्रकारचा,तसला
२४.तीन दुणे
२५.जिचा पती मरण पावला आहे अशी,गतधवा
२७.दान उलटे करा
२८.राई,शिखर
३१.ताकद,शक्ती
३२.गीत रचयीता
३४.फार मोठया फरकाने या अर्थी
३६.गुन्हा,चुक
३७.आजुबाजूचा आसमंत,मैदान
३८.परंतु,किंतू,अट
४०.एक संख्या
४२.एक सारखे पाहणे,निश्चल दृश्टी
४३.पावा,अलगुज
४५.दिनांक
४६.मुख,तोंड
५०.एक ऋतू,पर्जन्यकाळ
५१.वेतन
५३.अष्टविनायकापैकी महाड येथील प्रसिध्द गणपती
५८.घोडयाची शाळा
५९.वाळुच्या रेघावरून शकुन पाहण्याची एक विदया
६०.क्रिकेटमधील धाव
६२.पक्ष्यांचा आवाज,चिवचिवाट
६४.कब्जा
६५.हिंदीत दया,कीव,एक प्राणी
६७.राक्षस,असुर
६९.पोपट,राघु
७१.मुळासकट
७२.महाराष्ट्रातील प्रसिध्द एक मराठी गीत प्रकार
७३.फळातील मगज
७४.लीन,ओणवा,नत
७५.मनाला वाटेल तसा वागणारा
७७.नवरा मुलगा
७८.धातुचे सूत
७९.तिबेटी धर्मगुरू 'दलाई--'
८०.आईचा भाऊ
८१.महीना,मास
८२.शिर्डीचे प्रसिध्द दैवत
८३.वेदना,तीडीझाफ
८४.काख,बाजु उभे शब्द
१.स्वच्छ,निर्मळ,चझाफ्चकीत
२.तलसम उलटे करा
३.मुसलमानी थडगे
४.हिकमत,नाविन्यपुर्ण कला
५.आठवडयातील सुटटीचा वार
६.भागीदार,हरकत घेणारा
७.बुटका मानव,श्री विस्णुचा एक अवतार
८.इंग्रजीत रंग
९.मग्ण,धुंद
१४.नेहमी,सदैव
१६.लाकडाला लागणारा एक किडा
१८.मीन,मत्स्य
१९.गलबत,नाव,होडी
२१.जहाल विरूध्द,मऊ धोरणाचा
२२.गुंडगीरी
२६.उंचावरून पाण्याचा पडणारा प्रवाह
२७.नाही म्हणने
२९.झाड,वृक्ष
३०.अळणी,बेचव
३३.कष्ट,यातना,त्रास
३५.नुतन,नवा
३६.शर्त,पन
३७.बालकथेतील काल्पनीक पंख असलेली स्त्री
३८.कुटूंब,खानदानातील सर्व सदस्य
३९.बोटाच्या अग्रभागावरील कठीण आवरण
४१.साल,शके
४४.सार,कस
४७.खाटीक
४८.शिवाजी महाराजांचा राज्यभिषेक या पंडीताकडुन करण्यात आला '--भटट'
४९.किल्ली
५०.पाणी पाझरण्यासाठी बांधलेला तलाव
५१.ज्याला पगार आहे असा
५२.वाट,पथ
५३.उणे करण्याची एक क्रिया
५४.डोंगराची तुटलेली कपार
५५.देवलोकातील कळलाव्या ऋषी
५६.मृत्यू हरण करणारा
५७.लेखणी,पेन
५८.भिंतीवर सरपटणारा एक प्राणी
६१.नरामध्ये श्रेष्ट
६३.जंगल,अरण्य
६६.इंडीयण,गदर,नरसिंहा आदी चित्रपटांच्या नायकाचे फक्त नाव
६८.जंगलातलया फुलांचा हार
७०.धुंद,रत,मग्ण
७१.सारखा,तुल्य,सम
७३.एक राजस्थानी नृत्य प्रकार
७६.मिळुन मिसळुन काढलेला प्रवास
७८.मोठया बहीणीला मारावयाची हाक
८०.महीना,माह
८१.मागोवा,पाठपुरावा,शोध



## मागील शब्दकोडे चे उत्तर

**आडवे उत्तर**
१.मी शरण तुला भगवंता ८.पारा
१०.खोड ११.नरम १२.लाख
१३.बजरंगबली १५.मणका
१७.मोका १९.आड २२.कमलाकर
२३.तबक २५.बाराखडी २७.चावी
२८.बाबत ३०.जब ३२.चव
३३.करवत ३४.ईश्वर ३६.वसन
३९.सकट ४१.राजरोस ४२.टप
४४.राजस ४५.विनवणी ४७.जनता
४९.निलाजरा ५०.वा ५१.खरडपट्टी
५२.माह ५४.तालेवार ५७.पाव
५९.खसखस ६१.डाक ६३.सुरमा
६५.माल ६६.पाक ६७.वारसा
६९.डमडम ७०.परतावा ७१.चक्र
७२.नयन ७४.मन ७५.परागंदा
७७.लगाम ७८.सह ८०.दम
८१.रबरी ८२.मदनबाण ८३.ठो

**उभे उत्तर**
१.मीन २.शरम ३.रमण ४.तुला
५.लाखमोलाचा ६.गज ७.ताबडतोब
८.पारंगत ९.राग १०.खोली
१४.बराक १६.काकडी १८.काकवी
२०.अलबत २१.अंबाबाई
२४.बळकट २६.खबर २८.बावळट
२९.तपास ३०.जवळी जरा
३१.ऐवज ३५.श्वसन ३७.सरोज
३८.नसनखवडा ४०.कफनी
४१.राणी ४३.पदोपदी ४४.राजहट्ट
४५.विजेता ४६.वनवास ४८.तार
४९अ.लामा ५३.पहेलवान
५५.लेखक ५६.रखवालदार ५८.सुर
६०.सर ६२.कडकलक्ष्मी ६३.सुमन
६४.मापन ६५.मातामह ६६.पालुपद
६८.सावकार ७३.यमन ७६.राम
७८.मम ७९.सण

## घरगुती वाद, अनैतिक संबंधातून काढला पतीचा काटा, पत्नी-प्रियकरासह कुटुंबीयांनी रचला कट, नांदगाव हादरले

नाशिक : घरगुती वाद व अनैतिक संबंधातून खुनाची धक्कादायक घटना नांदगाव तालुक्यात घडली आहे. पत्नी, प्रियकर, बहीण व मुलगा यांनी संगनमताने पतीचा काटा काढला असून २४ तासांच्या आत नांदगाव पोलिसांना घटनेची उकल करण्यात यश आले आहे.

याबाबत अधिक माहिती अशी की, मुंबई मनपाचे कर्मचारी दीपक गोण्या सोनवणे (५४, रा. वाघोरे, ता. अमळनेर, जि. जळगाव) यांची घरगुती वाद व अनैतिक संबंधातून पत्नी, प्रियकर, बहीण व मुलगा यांनी संगनमताने डोक्यात दगड घालून व लाकडी दांडक्याने मारहाण हत्या करण्यात आल्याची घटना नाशिकच्या नांदगाव येथील जातेगाव येथे घडली.

संशयित पत्नी पल्लवी दीपक सोनवणे, मेहुणी व मेहुणीचा मुलगा, नितीन चंद्रकांत मोरे (रा. म्हसवे, ता. पारोळा) यांनी संदीप (रमेश) महादू लोखंडे (रा. शेजवळ, ता. मालेगाव), साईनाथ बाबुलाल सोनवणे, लखन बाबुलाल सोनवणे (रा. पिंप्री हवेली, ता. नांदगाव) यांच्याशी संगनमत करून खुनाचा कट रचला. त्यानुसार दीपक यांना जातेगाव शिवारातील महादेव मंदिराजवळ बोलावून घेण्यात आले. या ठिकाणी लाकडी दांडक्याने व डोक्यात दगड मारून ठार केले. त्यांची दुचाकी रस्त्याच्या कडेला ढकलून देत प्रेत झाडावर टाकून असा अपघाताचा बनाव करत सर्वांनी पोबारा केला होता.

घटनास्थळी अपघाताचे चित्र दिसत असले तरी त्याबाबत संशय निर्माण झाल्याने पोलिसांनी तपासाची चक्रे फिरवली. आधारकार्डवरून मयताची ओळख पटल्यानंतर कुटुंबीयांच्या हालचालींवर लक्ष ठेवण्यात आले. परिस्थितीजन्य पुरावे आणि तांत्रिक विश्र्लेषणानंतर संशयितांची कसून चौकशी करण्यात आली. त्यातून खुनाचा उलगडा झाला. सोनवणे व मोरे परिवारातील सहा जणांनी ही हत्या केल्याचे आणि पत्नीदेखील सहभागी असल्याचे तपासात निष्पन्न झाले आहे. या प्रकरणी पोलिसांनी सहा जणांविरोधात खुनाचा गुन्हा नोंदवला आहे. तर २४ तासांच्या आत चार आरोपींना पोलिसांनी ताब्यात घेतले आहे. पोलीस पुढील तपास करत आहेत.

मागील काही दिवसांपासून नाशिक जिल्ह्यात गुन्ह्यांच्या घटनांमध्ये वाढ होत आहे. अल्पवयीन मुलांचाही गुन्हेगारीत सहभाग वाढत आहे. अलीकडे नाशिक शहरातील म्हसरूळ पोलीस ठाण्याच्या हद्दीत एका रिक्षा चालकाचा खून करण्यात आला. यामुळे शहरात मोठी खळबळ उडाली होती. आता नांदगाव तालुका खुनाच्या घटनेने हादरला आहे. शहरासह जिल्ह्यातील गुन्हेगारी रोखणे हे पोलिसांपुढे मोठे आव्हान आहे.

# उदगीरचे बस स्टॅन्ड गेले खड्ड्यात, कंत्राटदार मग्न निधी हडपण्यात




उदगीर/बालाघाट नेटवर्क/(एल. पी. उगिले) : उदगीर शहराचे बस स्थानक भव्य दिव्य होणार म्हणून गेल्या सहा सात वर्षांपासून उदगीरची जनता आतुरतेने वाट पाहत होती. या बसस्थानकाची मंजुरी माजी आ. सुधाकर भालेराव यांनी मिळवल्यानंतर, भूमिपूजनाचा दगडही रोवला होता. मात्र तांत्रिक बाबी खाली महाविकास आघाडी सरकारच्या काळात निधी कमी करून पुन्हा मंजुरी देण्यात आली. पुन्हा निविदा सुरू झाली. त्यावेळी पूर्वीचा भूमिपूजनाचा दगड उखडून टाकून, नवा दगड लावून श्रेय घेण्यासाठी सर्वांनी धडपड केली होती.

त्यानंतर बसस्थानकाचे कामही सुरू झाले. गेल्या वर्षी पाऊस झाला आणि बसस्थानकाच्या पर्यायी शेडमध्ये लोकांना बसायलाही जागा नाही, थांबायलाही जागा नाही, आणि रस्त्यावर सर्वत्र चिखलच चिखल, असे चित्र झाल्यानंतर पुन्हा मोठा निधी आणून छोट्या कंत्राटदाराला सांभाळले गेले. मुरूम टाकून तात्पुरता रस्ता बनवला गेला.

वास्तविक पाहता हे सर्व पर्यायी व्यवस्थेचा भाग बहुदा मुख्य निविदेमध्ये असावा, पण वाढपी आपला असल्याने निधी आला, कंत्राटदाराने त्याची विल्हेवाट लावली. आता पुन्हा त्याच कामासाठी पुन्हा निधी मागणी करून पुन्हा तीच ती अवस्था निर्माण करण्यामध्ये काही कार्यकर्ते धडपड करत असल्याचे समजते. जोपर्यंत बसस्थानकाचे बांधकाम पूर्ण होत नाही, तोपर्यंत बाजूच्या शेडमध्ये आणि बस येण्याच्या रस्त्याची व्यवस्था कंत्राटदाराने करणे गरजेचे असतानाही राजकीय वरदहस्ताचा लाड असल्यामुळे कंत्राटदार बिनधास्त आहेत. मात्र जनतेची मोठी गोची होत आहे.

एका बाजूला चिखलच चिखल, तर दुसऱ्या बाजूला खड्डेच खड्डे ! अशी अवस्था झाल्याने बसस्थानक आहे की खड्ड्यांचा बाजार? अशीच अवस्था निर्माण झाली आहे. बसस्थानकावर हव्या त्या कोणत्याही सुविधा नसल्यामुळे प्रवाशांचे हाल होत आहेत. बसस्थानक हे उत्तरत्या जागेवर असल्यामुळे नांदेड बिदर रस्त्यावरील पाणी सरळ बस स्थानकात येत आहे. त्यामुळे सर्व परिसर जलमय बनला आहे.

दुसऱ्या गावाच्या प्रवाशांना कुठे खड्डा आहे? आणि कुठे पाणथळ आहे? हे लक्षात न आल्याने बाहेरगावी निघालेले अनेक प्रवासी घसरून पडत आहेत. त्यांची होणारी तारांबळ हा वेगळाच प्रश्र्न आहे. प्रवाशांना थांबण्यासाठी उभारलेले शेड अपुरे आहेत, उन्हाळ्यात लोक आजूबाजूच्या झाडाखाली थांबून आसरा घेत होते. मात्र पावसाळ्यात भिजल्याशिवाय पर्याय उरला नाही, अशी अवस्था प्रवाशांची होत आहे. भरधाव येणाऱ्या बसेस आजूबाजूला थांबलेल्या प्रवाशांच्या अंगावर बिनधास्तपणे चिखल मिश्रित पाणी उडवत निघून जातात. एकंदरीत सर्वच बाजूंनी प्रवाशांची मोठी हेळसांड होत आहे.

राजकीय पुढारी मात्र ज्या पद्धतीने गेल्या वर्षी दहा लाख रुपयांचा निधी अशाच कामासाठी आला होता, तो पुन्हा यावा आणि आपल्याला फायदा व्हावा. यासाठी देव पाण्यात ठेवून बसले आहेत. वास्तविक पाहता या तात्पुरत्या सुविधा बसस्थानक व्यवस्थापकाकडून महामंडळाकडे पाठपुरावा करून, पूर्ण करून घेणे अपेक्षित आहे. मात्र यांना विचारावे कोण? सर्वच लोकांना राजाश्रय असल्याने नाईलाजाने सर्व काही अलबेल आहे. असे सांगत लोक गप्प बसत आहेत. ही लोकशाहीची सर्वात मोठी थट्टा आहे, असे म्हटले तर वावगे होणार नाही.

## पुण्यात १ कोटी ३९ लाख रुपयांचा गुटखा जप्त

### पुणे पोलीसांच्या गुन्हे शाखेची मोठी कारवाई

पुणे / बालाघाट नेटवर्क : हजारो कोटींच्या अमली पदार्थ प्रकरणानंतर आता पुण्यात करोडो रुपयांचा गुटखा तयार होत असल्याचे समोर आले आहे. सिंहगड रोडवरील नऱ्हे भागातील एका गोदामावर गुन्हे शाखेच्या पोलिसांनी छापा टाकला आणि कारवाई करत १ कोटी ३९ लाख रुपयांचा गुटखा जप्त केला आहे. याप्रकरणी चौघांना अटक करण्यात आली आहे. हा दै.बालाघाटचा आवाजने गेले वर्षभर सुरू केलेल्या गुटखाविरोधी ऑपरेशन गुटखा या मोहिमेचा इम्पेक्ट आहे.

पोलीस सूत्रांनुसार, पुण्यातील सिंहगड वरील नऱ्हे भागात गुटख्याचे गोदाम असल्याची माहिती गुन्हे अन्वेषण शाखेला मिळाली. या माहितीवरून पोलिसांनी धाड मारत १ कोटी ३९ लाख रुपयांचा गुटखा जप्त केला. त्याचप्रमाणे गुटखा बनवण्यासाठी लागणारा कच्चा मालही मोठ्या प्रमाणात जप्त करण्यात आला आहे. याठिकाणी गुटखा तयार होत असल्याचा संशय पोलिसांना असून याप्रकरणी चौघांना अटक करण्यात आली आहे. त्यांच्या एका साथीदाराचे निधन झाले आहे.

पुष्पेंद्र अकबल सिंग (वय २७, रा. नऱ्हे, मूळ उत्तर प्रदेश), सुनील पठाण सिंग (वय ४५, रा. नऱ्हे, मूळ उत्तर प्रदेश), मुकेश काळुराम गेहलोत (वय २८, रा. आंबेगाव, मूळ राजस्थान), चंदन अजयपाल सिंग (वय ३२, रा. नऱ्हे, मूळ, रा. उत्तर प्रदेश) अशी अटक करण्यात आलेल्या आरोपींची नावे आहेत. त्यांचा साथीदार नीलेश लालवाणी (वय ४०, रा. नऱ्हे) हा फरार झाला आहे. आरोपीविरुद्ध अन्न सुरक्षा मानके कायद्यान्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. राज्यात गुटख्यावर बंदी असतानाही गुटख्याची मोठ्या प्रमाणात विक्री होत आहे. हा गुटखा सर्रास पान टपरीमध्ये वेगवेगळ्या नावाने मिळतो.

नऱ्हे येथील एका गोदामात गुटख्याचा मोठा साठा असल्याची माहिती गुन्हे शाखा पोलिसांना मिळाली. या गोदामातून हा गुटखा शहरातील विविध भागातील विक्रेत्यांकडे पाठविला जात होता. शनिवारी रात्री सामाजिक सुरक्षा विभागाच्या पथकाने तसेच गुन्हे शाखेच्या युनिट दोनने या ठिकाणी छापा टाकला. पोलीस आयुक्त अमितेश कुमार, गुन्हे शाखेचे अतिरिक्त पोलीस आयुक्त शैलेश बलकवडे, पोलीस उपायुक्त अमोल झेंडे यांच्या मार्गदर्शनाखाली ही कारवाई करण्यात आली.

दै.बालाघाटचा आवाजने गेल्या वर्षभरापासून गुटख्याविरोधात ऑपरेशन गुटखा ही मोहीम सुरू केलेली आहे. या मोहिमेअंतर्गत गुटखा तस्करी, गुटखा तस्करीचे मार्ग, गुटखा तस्करांचा इतिहास, गुटखा तस्करांची संपत्ती, गुटखा उत्पादनाची ठिकाणे आदी विषयी विस्तृत माहिती दै.बालाघाटचा आवाजने वेळोवेळी प्रसिद्ध केली.त्याचप्रमाणे गुटखा तस्करीच्या लेखी तक्रारी व त्यांचा पाठपुरावा केला.

## वेदनेला उजागर करणारा गजल संग्रह म्हणजे 'साये में धूप' होय : अमरेश श्रीवास्तव




उदगीर / बालाघाट नेटवर्क : अपाहिज व्यथा को वहन कर रहा हूँ, तुम्हारी कहन थी, कहन कर रहा हूँ।

या काव्यपंक्तीच्या माध्यमातून असह्य दुःख वेदनांना जाहीर प्रकट करण्याचे धाडस कवी करत असून लोक लाजेला भिऊन अन्याय अत्याचार सहन करत वरवर हसू दाखवणाऱ्यांच्या तोंडून कधी सत्य बाहेर पडेल हे सांगण्यासाठी 'ये रोशनी है हकीकत मे एक छल लोगों, की जैसे जल मे झलकता हुआ महल लोगो।' म्हणत लोकांनी आता हे सर्व सहन न करता याविरुद्ध आवाज उठवला पाहिजे यासाठी.. हो गई है परिवर्तनसी पिघलनी चाहिए, इस हिमालय से कोई गंगा निकलनी चाहिए। अशा एकापेक्षा अनेक गजलांच्या माध्यमातून प्रस्थापितांच्या विरुद्ध विद्रोह पेरीत गजलेच्या माध्यमातून जणू उज्वल भविष्य सूर्याचे स्वागतच करत आहे की काय अशी कादंबरी म्हणजे 'साये मे धूप' ही होय. असे मत अमरेशजी श्रीवास्तव यांनी व्यक्त केले.

सिर्फ हंगामा खडा करना मेरा मक्सद नही, मेरी कोशिश है कि ये सुरत बदलनी चाहिए।

या व अशा स्वरूपाचे अनेक गजलांच्या रूपाने विद्रोहासाठी शस्त्र देणारे प्रसिद्ध गजलकार दुष्यंत कुमार लिखित 'साये मे धूप' या साहित्यकृतीवर प्रसिद्ध साहित्यिक अमरेश श्रीवास्तव लखनौ, उत्तर प्रदेश यांनी चला कवितेच्या बनात अंतर्गत चालू असलेल्या ३१५ व्या वाचक संवाद मध्ये अत्यंत प्रभावी असा संवाद साधला. डॉ. बी.आर. पाटील, आरोग्य अधिकारी लातूर यांचे अध्यक्षतेखाली बोलताना श्रीवास्तव पुढे म्हणाले की साहित्य म्हणजे आतल्या वेदनांना प्रकट करणे. समाजात दररोज घडणारे अन्याय अत्याच्यार व वाढणारा असंतोष याशिवाय भ्रष्ट राजकारण्यांना उघडे पाडण्यासाठी साहित्य हे एक खूपच प्रभावी माध्यम आहे. दुष्यंत कुमार यांनी 'मेरे सीने मे नही तो तेरे सीने मे यह आग कही लगनी चाहिए।. असे म्हणत अनेकांना व्यवस्थेच्या विरुद्ध आपल्या गजलेच्या माध्यमातून पेटवत राहिले. उठाव न करणाऱ्याला उद्देशून ते म्हणतात, तुम्हारे पैरों के नीचे कोई जमीन नही, कमाल यह है की तुम्हे यकीन नही।. राजकीय नेता म्हणजे एक गुडिया आहे आणि याच एक गुडिया की कई कटपुतलीयोंमें जान है.। अशा टोकाच्या भाषेत अनेक गजला लिहिणारे दुष्यंतकुमार म्हणतात जर एक नेता अनेकांना पेटवू शकतो तेंव्हा मी तर कवी आहे. कारण मुजमे रहते है करोडो लोग, तो मै चुप कैसे रहूॅ.।अशा अनेक गजलांसह उदाहरणे देत या साहित्यकृतीवर प्रभावी संवाद साधला.

यानंतर झालेल्या चर्चेत अनेकांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवला शेवटी उपस्थितांना जन्मदिनाची ग्रंथ भेट देऊन त्यांचा सन्मान करण्यात आला. यावेळी लहान बालकांनाही वाचनाची गोडी लागावी या उद्देशाने चालू केलेला 'मी वाचलेले पुस्तक' या सदराखाली कुमारी अल्लापुरे व कुमारी शर्वरी सोमवंशी या दोन मुलींनी त्यांनी वाचलेल्या पुस्तकातील काही कथा सांगितल्या. शेवटी अध्यक्षीय समारोपात डॉ. बी. आर.पाटील म्हणाले, की अनेक भाषांना एकत्र आणण्याचा गझल हा सर्वश्रेष्ठ साहित्यप्रकार आहे. मेरे गीत तुम्हारे पास सहारा पाणे आयेंगे, मेरे बाद तुम्हे मेरी याद दिल्याने आयेंगे. अशा कवींच्या या विचारांना सलाम करत प्रभावी अध्यक्षीय समारोप केला.

या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. डॉ.माधव कांबळे यांनी केले तर पाहुण्यांचा परिचय भागवत जाधव यांनी करून दिला शेवटी अध्यक्षीय समारोप डॉ.बी.आर. पाटील यांनी केला. शेवटी आभार मुरलीधर जाधव यांनी मानले. या कार्यक्रमासाठी खास लातूरहून आलेले शिक्षक नेते ब्रिजलाल कदम यांच्याच बरोबरीने प्राचार्य डॉ. शिवाजी सागर यांचे सह अनेक लहान विद्यार्थ्यांबरोबरच महिला व पुरुष मोठ्या संख्येने उपस्थित होते या कार्यक्रमाच्या यशस्वी ततेसाठी संयोजक अनंत कदम, प्रा. राजपाल पाटील, आनंद बिरादार ,तुळशीदास बिरादार हनुमंत मेत्रे आदींनी पुढाकार घेतला.

# महिलांची प्रेमप्रकरणात हत्या होणारच का ?

स्त्री ही काय पुरुषांच्या हातातील खेळणे आहे काय ? कोणीही तिला आपले प्रेमाच्या जाळ्यात ओढून तिचा मनसोक्त लाभ घेऊन तिचा कंटाळा आला नंतर प्रेम करण्यापूर्वी दिलेली खोटी आश्र्वासने व वचने न पाळता तिने जर लग्नासाठी तगादा लावला की तिचा कायमचाच काटा काढला जात असतो. कोणी नराधम एखाद्या रानटी पशूला सुद्धा लाजवेल असे अमानुष कृत्य केलेले बऱ्याच ठिकाणी दिसून आलेले आहे. प्रेम करून तिचा एक प्रकारे युज अँड थ्रो असाच अलीकडील प्रेमवीरा कडून प्रियसीचा वापर केलेळे आहेत. हे काय नवीन नाही.

शुल्लक काही करणास्तव दररोजच्या वागण्या किंवा बोलण्यात बदल झाला तर तो प्रियकर तिचेवर अनैतिक संबंधाचे संशय घेऊन तिचा छळ करण्याचा प्रयत्न करतात. एवढेच नव्हे तर तिचा कायमचा काटा सुद्धा काढतात. ती संधी शोधत असतात आणि तिचा निर्दयीपणे खून करतात. अशी एक बातमी माझ्या वाचनात आली आहे. ती अशी की वसईत प्रेमप्रकरणातून भरदिवसा तरुणीची हत्या. दुसऱ्याशी प्रेमसंबंध असल्याच्या संशयातून कृत्य : आरोपी पोलिसांच्या ताब्यात. नालासोपारा : गौराई पाड्याच्या वाढाण इंडस्ट्रिज मध्ये कामावर जाणाऱ्या २२ वर्षीय तरुणीची लोखंडी पान्याने वार करत प्रियकराने मंगळवारी सकाळी ८-३० च्या सुमारास निघृण हत्या केली.

मृत्यू झाल्यानंतरही त्याने तिच्यावर अनेक वार केल्याचे सीसीटीव्हीत दिसत आहे. हत्येनंतर प्रियकर मृतदेहाजवळ बसलेला असताना वालीव पोलिसांनी त्याला ताब्यात घेतले. आरती रामदुलार यादव ( वय वर्ष २२ उत्तर प्रदेश ) असे मृत तरुणीचे नाव आहे. तर रोहित यादव (वय वर्षे २९ राहणार हरयाणा ) असे आरोपीचे नाव आहे. तिचा मृतदेह शवविच्छेदनासाठी रुग्णालयात पाठवला आहे. या प्रकरणी वालीव पोलिसांनी हत्येचा गुन्हा दाखल करून तपासाला सुरुवात केली आहे. सहा वर्षा पासून आरोपी तरुणीवर प्रेम करत होता. या प्रेमप्रकारणाची घरच्यांना माहिती होती.

एक महिन्यापासून तिच्या वागण्यात बदल झाल्याचा संशय होता. तिचे दुसऱ्या सोबत प्रेमसंबंध असल्याच्या संशयातून त्याने रागाच्या भरात हे निघृण कृत्य केल्याचे पोलिसांनी सांगितले. तरुणी आणि आरोपी एकाच ठिकाणी राहत होते. दोघे एकमेकांना ओळखत होते. काही दिवसांपूर्वी रोहितने आरतीचा मोबाईल तोडला होता. तू मोबाईल दुरुस्त करून दे असे तिने सांगितले. मोबाईल दुरुस्त करणार नाही, असे सांगून त्याने मारहाण करून शिवीगाळ केल्याची तक्रार आरतीने ८ जून २०२४ रोजी आचोळे पोलीस ठाण्यात दिली होती. या संदर्भात पोलिसांनी अदखलपात्र गुन्हा दाखल केला होता. त्याची आरतीने त्यांच्यावर कारवाई करू नका असे पोलिसांना सांगितले होते.

परंतु आरोपीला १४९ ची नोटीस बजावली होती, असे वरिष्ठ पोलीस निरीक्षक बाळासाहेब पवार यांनी सांगितले. त्यानुसार आचोळे पोलिसांनी पुन्हा असे करणार नाही असे रोहित कडून वदवून घेतले होते. त्याचा राग मनात धरून मंगळवारी सकाळी तरुणी कामावर जात असताना लोखंडी पान्याच्या साह्याने वार करून हत्या केली. याप्रकरणी वालीव पोलीस ठाण्यात खुनाचा गुन्हा दाखल करून आरोपी रोहितला ताब्यात घेतले आहे. रोहितला तिच्याशी लग्न करायचे होते, मात्र तो बेरोजगार असल्यामुळे लग्नाला आरतीच्या घरच्यांचा विरोध होता असे पोलिसांनी सांगितले.

मृत मुलीची बहिण सानिका हिने आचोळे पोलिसांनी आरोपी रोहितवर कारवाई केली नसून, पैसे घेतल्याचा आरोप केला आहे. मात्र पोलिसांनी हे आरोप फेटाळून लावले आहेत. ८ जून २०२४ ला रात्री ११:४५ वाजता तक्रार दाखल करण्यात आली. तसेच आरोपी रोहितवर १४९ प्रमाणे प्रतिबंधक कारवाई केली आहे. अशी माहिती आचोळे पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक बाळासाहेब पवार यांनी दिली आहे.

समाजातील अनास्था,संवेदनशून्यतेचा गंभीर प्रश्र्न उभा.... रोहित यादव नामक व्यक्तीने आपल्या प्रियेसी आरती यादवची लोखंडी पान्याने भररस्त्यात केलेली हत्या अतिशय दुर्दैवी आणि संताप जनक आहे.

या घटनेच्या वेळी रस्त्यावर मोठ्या प्रमाणात लोकांची गर्दी होती. दुर्दैवाने कोणीही आरतीला वाचवण्यासाठी पुढे आले नाहीत. उलट लोक व्हिडिओ काढण्यात मग्न होते. एका तरुणाने आरोपीला अडवण्याचा प्रयत्न केला पण तो प्रयत्न निष्फळ ठरला, लोकांनी वेळेवर मदत केली असती तर कदाचित आरतीचे प्राण वाचू शकले असते. या घटनेने समाजातील अनास्था आणि संवेदनशून्यतेचा गंभीर प्रश्र्न उभा केला आहे. 'झीरो टॉलरन्स टू ऑल टाईप ऑफ व्हायोलेन्स अगेन्स्ट वुमेन्स ' अशी मोहीम हाती घेतली होती. महिलावरील अत्याचार सहन केले जाणार नाही. यासाठी पोलिसांनी विशेष करून पालघर, कोकण व संपूर्ण महाराष्ट्रात देखील लोकसहभाग वाढवून भूमिका घ्यावी.

अशी मागणी विधान परिषदेच्या उपसभापती नऱ्हे पोलीस महासंचालक रश्मी शुक्ला यांना पत्र लिहून केली आहे. बडीकॉप योजनेअंतर्गत सर्वसामान्य नागरिक देखील कॉन्स्टेबलच्या माध्यमातून स्वसंरक्षणासाठी प्रयत्न करू शकतात. लोकांची धैर्य वाढवून वेळप्रसंगी ते मदतीला धावले पाहिजेत. यासाठी पोलिसांनी त्यांचा विश्र्वास वाढवणे गरजेचे आहे. वेळ पडल्यास संरक्षणासाठी महिलांना हत्यार देण्यात यावे, असे देखील त्या म्हणाल्या. अशा प्रकारच्या घटनांमध्ये दोषींना कठोर शिक्षा होणे अत्यंत आवश्यक भविष्यात अशा घटनांची पुनरावृत्ती होऊ नये.



रोहित यादवने केलेल्या या अमानुष कृत्यासाठी त्याला कठोरात कठोर शिक्षा व्हावी अशी आमची मागणी आहे. पीडित मुलीच्या कुटुंबाचे मानसिक समुपदेशन करण्यात यावे तसेच पीडित कुटुंबाला मनोधैर्य योजनेतून तत्काळ मदत करण्यात यावी. असेही गोऱ्हे यांनी म्हटले आहे.

वरील बातमी वाचल्यानंतर आपल्या देशात कोणालाच कोणाची भीती राहिलेली नाही. त्यामुळे अशा प्रकारच्या प्रियंकराकडून आणखी किती महिलाच्या हत्या होणार आहेत हे काही कळत नाही. अशा निर्दयी नराधमांस कठोरात कठोर शिक्षा देणे गरजेचे आहे. सलग सहा वर्षभर प्रेम करून अशा प्रकारे त्याचा शेवट होत असेल तर महिलांनी सावध राहिले पाहिजे.

कोणी नराधम प्रियकर आपल्यावर कधी संशय घेऊन आपला असा निर्दयी पशूला लाजवेल असे आमनुषपणे हत्या करीत असेल तर अशा प्रियंकारापासून चार हात दूर राहणेच योग्य ठरेलं. अन्यथा महिलाची प्रेमप्रकरणात हत्या होणारच का ? असाच प्रश्र्न तुमच्या आमच्या मनात घर करून बसला आहे हे कोणी नाकारू शकत नाही.

**लेखक**
**जी. एस.कुचेकर पाटील**
**भुईंज तालुका वाई जिल्हा सातारा**
**मो. न.७५८८५६०७६१**
**दैनिक बालाघाट नेटवर्क**

हे पत्र मुद्रक एन.पी.घोणे यांनी मालक, प्रकाशक, संपादक भोसले हरूबाई दत्तात्रय यांनी मॅजिक पब्लीकेशन, मनपा शॉपींग कॉम्पलेक्स, गांधी चौक, लातूर, जि.लातूर-४१३५१२ माहा.येथे छापून उदगीर, जि.लातूर येथे प्रकाशीत केले. संपादक : भोसले हरूबाई दत्तात्रय RNI No. MAHMAR 2019/78242